दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द


# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३१९ । बुधवार २ सप्टेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

# कुकडीसाठी ५ हजार ७०४ कोटींची मान्यता

## डिंबे–माणिकडोह बोगद्याला राज्य सरकारची मंजुरी

- अहिल्यानगरसह तीन जिल्ह्यांतील सुमारे दीड लाख हेक्टर शेतीला मोठा फायदा
- दक्षिण नगर दुष्काळमुक्त होण्याचा मार्ग मोकळा : डॉ. सुजय विखे पाटील यांनी पाळला शब्द
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुती सरकारचे विखे पाटलांनी मानले आभार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** कुकडीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या डिंबे ते माणिकडोह धरणांना जोडणाऱ्या सुमारे १६ किलोमीटर लांबीच्या बोगद्याच्या प्रकल्पाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पासाठी ५,७०४.५० कोटी रुपयांच्या सुधारित खर्चासही मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे कुकडी प्रकल्पातून १,४४,९१२ हेक्टर सिंचन क्षम ता निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, अहिल्यानगरसह पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मि ळणार आहे. दक्षिण अहिल्यानगरचा दुष्काळी पट्टा दुष्काळमुक्त होण्यासाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत डिंबे–माणिकडोह बोगद्याच्या म हत्त्वाकांक्षी प्रकल्पाला हिरवा कंदील मिळाला. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याने कुकडीच्या डाव्या कालव्यावरील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न अधिक भक्कम होणार आहे.

या बद्दल बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, दक्षिण नगर भागातील शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. साकळाई योजनेचा प्रश्न मार्गी लावल्यानंतर आता डिंबे–माणिकडोह बोगद्याचा निर्णय झाला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न भाजप आणि आपणच मार्गी लावू, असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले होते. आज राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे ते आश्वासन प्रत्यक्षात येत असल्याचा आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले.

> या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री सुनीत्राताई पवार तसेच राज्याचे जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष आभार मानले. तसेच माजी मंत्री व आमदार बबनराव पाचपुते यांनीही या प्रश्नासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले. राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे कुकडी प्रकल्पातील पाण्याचे नियोजन अधिक प्रभावी होऊन शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाचा आधार मिळेल, असा विश्वासही डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

माणिकडोह धरणातील पाण्याचा मुख्य उपयोग कुकडी डावा कालवा आणि त्याखालील लाभक्षेत्रातील शेतीसाठी होणार असल्याने या प्रकल्पाचा थेट फायदा शेतकऱ्यांना मिळणार आहे.

कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित खर्चास ५,७०४.५० कोटी रुपयांची मान्यता मि ळाल्याने प्रकल्पाच्या सिंचन क्षमतेला मोठे बळ मिळणार आहे. या माध्यमातून १,४४,९१२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार असून, पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना त्याचा मोठा लाभ होणार आहे. कुकडी डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील पुणे जिल्ह्यातील जुन्नर, अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा व कर्जत तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला **(पान ४ वर)**

# वनहक्कपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ

## महाराष्ट्र सरकारचा निर्णय : दोन लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिलासा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यातील वनहक्कपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र सरकारने मोठा दिलासादायक निर्णय घेतला आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना'अंतर्गत आता वनपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत घोषणा केली.




या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दुसरा हप्ता त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला आहे. त्याचवेळी वनहक्कपट्ट्यावर शेती करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांनाही कर्जमाफीच्या कक्षेत आणण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील दोन लाखांहून अधिक आदिवासी शेतकऱ्यांना लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

वनहक्कपट्टेधारक शेतकरी अनेक वर्षांपासून शेती करत असले तरी कर्जमाफीच्या योजनांमध्ये त्यांचा समावेश करण्याची मागणी केली जात होती. सरकारच्या या निर्णयामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर दरम्यान राज्यात महसूल पंधरवडा अभियान राबवला जाणार आहे.

यात वनपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांना ७ ई व १२ ई उपलब्ध करून देणे. तसेच ज्यांचे दावे स्वीकारण्यात आले नाहीत; त्यांचे दावे पुन्हा स्वीकारणे यासाठी हे विशेष अभियान राबवले जाणार असल्याचं महसूलमंत्र्यांनी यावेळी सांगितले. आदिवासी शेतकऱ्यांना वनपट्टे मिळाले आहेत. त्यांना ७ ई व १२ ई मिळाल्यानंतर त्यांच्या हक्काचा एक रेकॉर्ड तयार होईल. यासह केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा त्यांना लाभ मिळेल.

ज्यांना वनपट्टे मिळालेच नाहीत. पण त्यांचे दावे आहेत. ते दावे पुन्हा म ान्य करण्यासाठी ग्रामस्तरीय वनहक्क समिती, जिल्हास्तरीय वनहक्क समिती या कालावधीत कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा शासन निर्णय आज किंवा उद्या जारी होईल. जेणेकरुन यातून सुटलेल्या तसेच जास्त जमीन असून, कमी दावे स्वीकारले. ज्यांचे दावेच मान्य केले नाहीत. त्यांच्यासाठी पुनर्विलोकन करण्याची योजना तयार केली असल्याचे मंत्री बानवकुळेंनी नमूद केले.

# सरकारी कार्यक्रमांमध्ये मिळणार आरोग्यदायी अन्नपदार्थ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्याचे अन्न व औषध प्राशसं आयुक्त तुकाराम मुंडे यांनी भेसळखोरांविरिद्ध चालविलेल्या धडाकेबाज कारवाईनंतर आता राज्य सरकारने शासकीय, निमशासकीय बैठका, शासकीय कार्यक्रम व उपहारगृहात आरोग्यदायी अल्पोपहार आणि जेवण उपलब्ध करून देण्याचा आणि तशाच पद्धतीचा मेनू ठेवणे बंधनकारक करण्याचा निर्णय, आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना बैठका, कार्यक्रम आणि प्रशिक्षणाच्या वेळी संतुलित व पौष्टिक आहार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. आरोग्यदायी जीवनशैली आणि पोषक आहाराची सवय ही शासकीय कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावी, या उद्देशाने सर्व विभागांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत.

बैठका, कार्यक्रम, प्रशिक्षण संस्था, परिषदा तसेच उपहारगृहांमध्ये अल्पोपहार अथवा भोजन देताना आरोग्यदायी पर्यायांचा समावेश करण्यात येणार आहे. यामध्ये हंगामी फळे, केळी, सफरचंद, पेरू, पपई यांसारखी फळे, उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य, पोहे, इडली–सांबार, मागणीनुसार गरम दूध, साखरविरहित ग्रीन टी, नाचणीची भाकरी, ज्वारी–बाजरीची भाकरी, ताक, कोशिंबीर, विविध भाज्या, डाळी व उसळी यांसारख्या पौष्टिक पदार्थांना प्राधान्य देण्यात येणार आहे.



अल्पोपहारामध्ये तेलकट व अति–प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचे प्रमाण कमी करण्याबरोबरच पौष्टिक घटक असलेल्या स्थानिक व पारंपरिक खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. जेवणाम ध्ये डाळ, उसळ, पालेभाज्या, ताक, कोशिंबीर, भाजी आणि आवश्यकतेनुसार संतुलित धान्यांचा समावेश करण्याची सूचना करण्यात आली आहे.

संबंधित कार्यालयांच्या नवीन खानपान (केटरिंग) करारामध्ये आरोग्यदायी मेनूचा समावेश करणे बंधनकारक करण्यात येणार आहे. या निर्णयाची योग्य अंमलबजावणी करण्यापूर्वी संबंधित शासकीय तसेच निमशासकीय संस्थांनी आपल्या कर्मचाऱ्यांशी आरोग्यविषयक भूमिकेबाबत चर्चा करावी, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

शासकीय व निमशासकीय संस्थांनी आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्यदायी जीवनशैली आणि पौष्टिक आहाराबाबत आवश्यक जनजागृती करावी तसेच संतुलित आहाराचे मेनू उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार **(पान ४ वर)**

# धरणे भरुनही मराठवाड्यावर जलसंकट!

## जायकवाडी ९५ टक्क्यांवर; मराठवाड्यातील एकूण पाणीसाठा केवळ ४९.६८ टक्के
## अहिल्यानगरचे जलचित्र : उत्तर भाग सुखावला, दक्षिणेकडे चिंता!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्यातील धरणांमध्ये यंदा एकीकडे समाधानकारक पाणीसाठा झाला असून अनेक प्रमुख धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत, मात्र मराठवाड्याच्या जलचित्रात अजूनही चिंतेची छाया कायम आहे. राज्यातील ३ हजार ३२ प्रमुख मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांमध्ये सरासरी ७५.७९ टक्के अर्थात १ हजार ९२.३८ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला असताना, छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील तब्बल ९२९ प्रकल्पांमध्ये हा साठा केवळ ४९.६८ टक्क्यांवर आहे.

विशेष म्हणजे मराठवाड्याची जीवनवाहिनी असलेल्या जायकवाडी धरणात तब्बल ९४.७४ टक्के पाणीसाठा झाला असून धरण जवळपास पूर्ण क्षम तेने भरले आहे. असे असतानाही संपूर्ण मराठवाड्यातील धरणांची एकत्रित स्थिती मात्र चिंताजनक असल्याचे चित्र आहे. आगामी परतीच्या पावसाने मराठवाड्याच्या धरणांमध्ये मोठी भर पडणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत जलसंपत्ती अभ्यासक व सेवानिवृत्त अभियंता इंजि. हरिश्चंद्र र. चकोर यांनी व्यक्त केले.

राज्यातील एकूण पाणीसाठा गतवर्षीच्या तुलनेत सुमारे ११७.४७ टीएमसीने कमी आहे. गतवर्षी १ सप्टेंबर रोजी राज्यातील उपयुक्त पाणीसाठा ८३.९४ टक्के होता, तर यंदा तो ७५.७९ टक्क्यांवर आहे. मात्र पावसाळ्याचा काही कालावधी अद्याप शिल्लक असल्याने पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची अपेक्षा आहे.

**अहिल्यानगरमध्ये पाणी कुठे भरले, कुठे चिंता? तुडुंब धरणे**

- निळवंडे : १०० टक्के
- आढळा : १०० टक्के
- पिंपळगाव खांड : १०० टक्के
- भंडारदरा : ९८.७० टक्के
- मुळा : ९५.५४ टक्के

**कमी पाणीसाठ्याचे प्रकल्प**

- सीना : ४०.५४ टक्के
- खैरी : १८.०८ टक्के
- मांडोहोळ : १७.८५ टक्के
- घाटशीळ पारगाव : १२.३६ टक्के

**जिल्ह्यातील प्रमुख प्रकल्पांतील एकूण पाणीसाठा :**

४७.७५६ टीएमसी अर्थात ८१.४१ टक्के

**मराठवाड्याची एकूण स्थिती**

- एकूण प्रकल्प : ९२९
- उपयुक्त पाणीसाठा : १२८.०९० टीएमसी
- पाणीसाठ्याची टक्केवारी : केवळ ४९.६८ टक्के

**जायकवाडीची दिलासादायक स्थिती**

- एकूण पाणीसाठा : ९७.३३० टीएमसी
- भराव : ९४.७४ टक्के
- यंदाची नवीन आवक : ६५.७४० टीएमसी
- गोदावरी नदीपात्रात सोडलेले पाणी : ५.७९० टीएमसी

राज्यातील अनेक विभागांमध्ये धरणे भरत असताना मराठवाड्यातील एकूण जलसाठा अजूनही ५० टक्क्यांच्या खाली असल्याने उर्वरित पावसाळा आणि परतीचा पाऊस मराठवाड्यासाठी निर्णायक ठरणार आहे.



अहिल्यानगर जिल्ह्यातील शेती व पिण्याच्या पाण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या प्रमुख प्रकल्पांमध्ये सध्या ४७.७५६ टीएमसी अर्थात ८१.४१ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. जिल्ह्याची एकूण स्थिती समाधानकारक असली तरी पाणीसाठ्याचे वितरण अत्यंत असमतोल असल्याचे स्पष्ट झाले आहे.उत्तर अहिल्यानगरमधील भंडारदरा, निळवंडे, मुळा आणि आढळा ही प्रमुख धरणे जवळपास पूर्ण क्षमतेने भरली आहेत. त्यामुळे अकोले, संगमनेर तसेच जिल्ह्याच्या मोठ्या भागातील शेती **(पान ४ वर)**

# भुईकोट किल्ला विकासाला गती

## महाराष्ट्र शासन व नगर लष्कर विभागात सामंजस्य करार

## पालकमंत्री डॉ. विखे व आ. संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष असलेल्या भुईकोट किल्ल्याच्या विकासाचा रखडलेला मार्ग आता मोकळा झाला आहे. भुईकोट किल्ला विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभाग यांच्यात सामंजस्य करार (चजण) संपन्न झाला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि स्टेशन कमांडर पी. सुनील कुमार यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथील लष्कराच्या मुख्यालयात हा करार करण्यात आला. या करारामुळे किल्ल्याच्या संवर्धनासोबतच पर्यटनाच्या दृष्टीने प्रस्तावित विविध विकासकामांना प्रत्यक्ष गती मिळणार आहे.



पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून भुईकोट किल्ल्याचा विकास करण्याची घोषणा केली होती. भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी यासाठी विशेष पुढाकार घेत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नातून केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या 'स्वदेश दर्शन २.०' योजनेअंतर्गत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला १७ मार्च २०२५ रोजी प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरी मिळाली होती.

मात्र, भुईकोट किल्ला लष्कराच्या अखत्यारीत असल्याने प्रत्यक्ष विकासकामे सुरू करण्यासाठी लष्कराची अंतिम परवानगी आवश्यक होती. या प्रक्रियेमुळे प्रकल्पाला विलंब झाला. आता महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभागामध्ये सामंजस्य करार झाल्याने विकासकामांच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा अडथळा दूर झाला आहे.

**भुईकोट किल्ल्याचा होणार कायापालट**

भुईकोट किल्ल्याच्या ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन करताना पर्यटकांसाठी आधुनिक आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन या प्रकल्पात करण्यात आले आहे. किल्ल्याच्या प्रवेशद्वारापासून परिसरातील पायाभूत सुविधांपर्यंत विविध विकासकामे केली जाणार आहेत. यामध्ये भव्य प्रवेशद्वार, वाहनतळ आणि स्वच्छतागृहांची सुविधा उभारण्यात येणार आहे. तसेच किल्ल्याच्या ऐतिहासिक तटबंदीचे संवर्धन करून पर्यटकांना किल्ल्याचा इतिहास आणि वास्तूचे महत्त्व समजावे यासाठी इंटरप्रिटेशन सेंटर उभारण्यात येणार आहे. किल्ल्याच्या पर्यटन विकासातील महत्त्वाचे आकर्षण ठरणाऱ्या **(पान ४ वर)**



अहिल्यानगर जिल्ह्यात पर्यटनाच्या मोठ्या संधी आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्याकडे पत्रव्यवहार तसेच पाठपुरावा केला होता.यासाठी त्यांचे सहकार्य मिळाले.पर्यटनातून रोजगार निर्मिती करण्याचा आपला प्रयत्न असून, जिल्ह्याला लाभलेला ऐतिहासिक, नैसर्गिक आणि अध्यात्मिक वारसा स्थळांचा विकास करून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्याचा प्रयत्न आहे.

**- डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**

# हिमालय की गोदमे ....!!




मागील आठवड्यात नेपाळमध्ये जलप्रलय झाला. हजोरोचे बळी गेले. क्षणात होत्याचे नव्हते झाले. हे नैसर्गिक संकट जगाने अनुभवले.'जन पळभर म्हणतील हाय हाय ' नुसार शोक व्यक्त झाला. पण,'मी जाता मागे राहील कार्य काय?' ह्या पुढील पंक्तींचा सर्वांना विसर पडतो . ह्या पश्नाचे उत्तर मिळवायचे असेल तर त्यासाठी हिमालयाच्या कुशीत जावे लागेल. हिमालयाची कूस जाणून घ्यावी लागेल. यासाठी हिमालययाची जन्मकथा समजून घेणे गरजेचे आहे.हि जन्मकथा उलगडली तरच नेपाळमधील अनर्थाची व्यथा कळणार आहे.म्हणूनच हिमालय की गोदमे जावूयात...

. हिमालय हा पृथ्वीवरील सर्वात तरुण पर्वत मानला जातो. भारतीय प्लेट आणि युरेशीयाची प्लेट यातील टकरावातून हिमालयाची निर्मिती झाली. हिमालय हा मातीचा आणि ठीसूळ पर्वत आहे. नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात भोटेकोशी नदीला आलेल्या भीषण महापुराने पुन्हा एकदा हिमालयीन पट्ट्याच्या ठिसूळ वास्तव्याकडे लक्ष वेधले आहे.

या दुर्घटनेकडे केवळ एक नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहणे अपुरे ठरेल. तिबेटमधून उगम पावणाऱ्या नद्या, चीनच्या सीमापार जलधोरणाबद्दल चिंता आणि उत्तराखंडसारख्या भारतीय सीमावर्ती भागांत अलीकडे पडलेल्या तत्सम घटना, हे सारे धागे एकत्र गुंफून पाहिले, तरच या घटनेचे खरे स्वरूप समजू शकते.

आजही भारतीय टेक्टोनिक प्लेट दरवर्षी काही सेंटीमीटरने उत्तरेकडे सरकत असल्याने हिमालयाची उंची वाढत आहे.त्यामुळे हिमालयाचा भूभाग अत्यंत सक्रिय, अस्थिर आणि अनेक ठिकाणी भूस्खलन व भूभंगासाठी अतिसंवेदनशील आहे. हिमालयाचा परिसर हा भूकंपप्रवण क्षेत्र मानले जाते.

. भूस्खलन हा त्या भागात नित्याचे आहे. वाढत्या जागतिक तापमानामुळे हिमनद्या वितळत असल्याने संपूर्ण हिमालयीन पट्ट्यात सतत हिमतलाव तयार होत आहेत. त्यातील अनेक अस्थिर आहेत आणि कोणत्याही क्षणी फुटू शकतात.या नैसर्गिक ठिसूळतेला जोड आहे ती या संपूर्ण पट्ट्यात भारत, चीन, नेपाळ, भूतान या सर्व देशांकडून मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची. रस्ते, बोगदे, जलविद्युत प्रकल्प आणि पूल अस्थिर उतारांवर उभारले जात असल्याने नैसर्गिक व्यवस्थेत बदल होतो आणि आपत्तीची तीव्रता वाढते.

. तिबेटमधील यारलुंग त्सांगपो (ब्रह्मपुत्रा) नदीवर चीन जगातील सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प उभारत आहे. ब्रह्मपुत्रेच्या पाण्याच्या वाटपाबाबत भारत–चीनमध्ये बंधनकारक जलवाटप करार नसताना सुरू असलेला हा प्रकल्प भारत, बांगलादेशसाठी दीर्घकालीन जलसुरक्षेचा प्रश्न उभा करतो. भविष्यात धरणातून अचानक मोठ्या प्रमाणात विसर्ग झाल्यास ईशान्य भारतातील सीमावर्ती भागांत विनाशकारी पूरस्थिती ओढवू शकते, तर पाण्याचा प्रवाह रोखल्यास अरुणाचल व आसाममधील लाखो शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर व नदीकाठच्या आदिवासी समुदायाच्या अस्तित्वावर वाईट परिणाम होऊ शकतो. शिवाय तो भूभाग भूकंपप्रवणही आहे.

त्यानंतर भारतानेही ह्या खोऱ्यात ११,२०० मेगावॉटचा मोठा जलविद्युत व पूर नियंत्रण प्रकल्प हाती घेतला आहे. ती भारताची सामरिक चाल म्हणता येईल. पाणी युद्धातील शस्त्र बनू शकते, ही संकल्पना नवी नाही. भारताने स्वतःच अलीकडे त्याचा प्रत्यय दिला आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबतचा सिंधू जलवाटप करार स्थगित केला आहे. पाकिस्तान सीमापार दहशतवादाला पूर्णपणे व विश्वासार्हपणे लगाम घालत नाही, तोपर्यंत स्थगितीच राहील, अशी ठाम भूमिका भारताने घेतली आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान व लष्करप्रमुखांपासून अनेक नेत्यांनी भारताच्या या निर्णयाला 'दुहेरी कारवाई' संबोधत, चीनला सोबत घेऊन प्रत्युत्तर देण्याच्या धमक्याही दिल्या आहेत.

सिंधू खोऱ्यात भारत वरच्या बाजूला (अपस्ट्रीम), तर ब्रह्मपुत्रा खोऱ्यात खालच्या बाजूला (डाउनस्ट्रीम) असल्याची वस्तुस्थिती आहे. चीन आणि पाकिस्तानचे सख्य बघता, उद्या चीनकडून भारताच्या हिताच्या पाण्याचा वापर केला जाण्याचा धोका नाकारता येत नाही.

. अस्थिर भूरचना आणि वाढते हवामानबदल हे आपत्तीचे मूळ कारण आहे. या नैसर्गिक ठिसूळतेवर बेबंद विकासप्रकल्प अतिरिक्त ताण निर्माण करतात.नेपाळमधील महाप्रलय, हिमालयात वारंवार उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्ती आणि सिंधू, ब्रह्मपुत्रेच्या पाण्यावरून निर्माण झालेले तणाव, या समान समस्या आहेत.

इथे एक सावधगिरीचा इशाराही आवश्यक आहे. राजकीय अविश्वासाच्या भरात प्रत्येक नैसर्गिक आपत्तीला शत्रूच्या कारस्थानाशी जोडून पाहण्याचा मोह टाळला पाहिजे. नेपाळमधील महाप्रलय तिबेटमधील अतिवृष्टी, ढगफुटी किंवा हिमनदी फुटण्यासारख्या नैसर्गिक कारणांतून पडला असण्याची शक्यता अधिक दिसते.

परंतु सीमापार नदी–माहिती सामायिकरणातील अपारदर्शकतेचा अभाव आणि आंतरराष्ट्रीय जलकरारांच्या चौकटीतील त्रुटी या वस्तुनिष्ठ बाबींकडे दुर्लक्ष करणेही चुकीचे ठरेल. आशंका आणि तथ्य यांतील सीमारेषा स्पष्ट ठेवूनच या विषयावर विवेकी चर्चा व्हायला हवी.

राजकारण आणि धोरणांच्या पलीकडे जाऊन या साऱ्या घडामोडींकडे पाहण्याची गरज आहे.

. वाढत्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती संकटात सापडलीय.हे संकट शेतकऱ्यापुरते नसून मानवी समूहापुढे आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे अन्नसाखळी विस्कळीत होतं आहे. भविष्यात उपासमारीचे संकट जगापूढे उभे ठाकणार आहे.यासाठी हिमालयाच्या कुशीत जे घडले, त्याची गंभीरतेने दखल घ्यावी लागेल. निसर्गाच्या हाका सावधतेने ऐकाव्या लागतील. याकडे दुर्लक्ष करून बेफिकिरपणा केला तर,मानवी समूहाचा आणि संस्कृतीचा अंत ठरलेला आहे !

# बधे हिरो शोरूममुळे टाकळीभानच्या वैभवात भर : हभप संतोष महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान:** हिरो कंपनी ही दुचाकी मधील नामांकित, उत्तम दर्जा असलेली वाहन कंपनी असून लाखो ग्राहकांचा विश्वास संपादन करून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले दुचाकी वाहन आहे. त्यामुळे यास निश्चित चांगला प्रतिसाद मिळेल. व टाकळीभानच्या वैभवा मध्ये या शोरूम मुळे निश्चित भर पडली असल्याचे प्रतिपादन हनुमान गडचे महंत ह. भ. प. संतोष महाराज चौधरी यांनी केले. टाकळीभान मधील अधिकृत बधे हिरो शोरूमचे उद्घाटन ह भ प संतोष महाराज चौधरी यांच्या शुभहस्ते पार पडले यावेळी महाराज बोलत होते.

यावेळी गावातील मान्यवर म्हणून माजी सभापती नानासाहेब पवार, सोसायटीचे चेअरमन राहुल पटारे, माजी सरपंच चित्रसेन रणनवरे, माजी व्हा. चेअरमन अविनाश लोखंडे, ग्राम. सदस्य गणेश पवार, शंकरराव शिंदे, अनिल बोडखे, पत्रकार अर्जुन राऊत, अक्षय कोकणे, सकाहरी शेजुळ, राजेंद्र देवळालकर, दिलीपराव बनकर,मिथुन जाधव, सुजित बावके, दत्तात्रय देठे, संदेश देठे, तुषार थोरात,राहुल कोकणे, शंकर ताठे,विजय लाड, पप्पू रणनवरे आदी सह गावातील मान्यवर पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी महाराजांच्या हस्ते शोरूमचे उद्घाटन झाले व टू व्हीलरचे पूजन करण्यात आले.

शोरूमचे चालक बावके व देठे परिवाराच्यावतीने महाराजांचे संत पूजन व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गावातील मान्यवर पदाधिकारी व ग्रामस्थांनी शोरूम उद्घाटन प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

# अयोध्येत दुमदुमला साई नामाचा गजर

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**



**अयोध्या :** पवित्र नगरी अयोध्येत सध्या श्रद्धा आणि भक्तीचा अनोखा संगम पाहायला मिळत आहे. अयोध्येच्या ऐतिहासिक भूमीवर साई नामाचा जयघोष दुमदुमला असून, साईभक्तांच्या उत्साहात साईबाबांची पालखी थेट प्रभू श्रीरामाच्या दरबारात दाखल झाली आहे.

या ऐतिहासिक सोहळ्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे देशाच्या विविध भागांतून आलेले सुमारे दीड हजार साई भक्त या पालखी सोहळ्यात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आहेत. शिर्डीपासून अयोध्येपर्यंतचा हा प्रवास भक्तांच्या अखंड श्रद्धेचे प्रतीक बनला असून, 'साई निर्माण'ची संकल्पना आणि उद्देश या पालखीच्या माध्यमातून पूर्ण झाल्याची भावना उपस्थित भक्तांनी व्यक्त केली.अयोध्येत पोहोचल्यानंतर या सर्व साईभक्तांनी अत्यंत भावूक होऊन प्रभू रामलल्लाच्या दर्शनाचा लाभ घेतला. श्रीरामाच्या दरबारात मस्तक टेकवून सर्व भक्त लीन झाले , ज्यामुळे संपूर्ण वातावरणात एक अफाट आध्यात्मिक ऊर्जा निर्माण झाली. रामनगरीच्या रस्त्यांवर साई बाबा की जय आणि जय श्री राम असा संयुक्त नारा बुलंद करण्यात आला, ज्यामुळे संपूर्ण अयोध्येचे वातावरण पूर्णपणे भक्तीमय झाले. शिर्डीचे साईबाबा आणि अयोध्येचे प्रभू श्री राम यांचे अद्वैत नाते या सोहळ्यामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, अयोध्येतील मुख्य मंदिरांपर्यंत पोहोचलेल्या या पालखीचे स्थानिक नागरिकांनी उत्साहात स्वागत केले. पालखी आगमनानंतर ज्यामध्ये दोन्ही ठिकाणच्या संस्कृती आणि भक्तीचा एक सुंदर समन्वय दिसून आला.

# आ. काळेंच्या निधीतून उर्दू शाळेच्या ६ वर्गखोल्यांचे काम होणार सुरु : मेहमूद सय्यद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव उर्दू हायस्कूलमधील विद्यार्थ्यांची वर्गखोल्यांची समस्या कायमची दूर करण्यासाठी आ.आशुतोष काळे यांनी उपलब्ध करून दिलेल्या ३० लाख रुपयांच्या निधीतून सहा नवीन वर्गखोल्या व शिक्षकांसाठी स्टाफ रूमचे बांधकाम लवकरच सुरु होणार असून राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक हाजी मेहमूद सय्यद यांनी सहकाऱ्यांसमवेत होणाऱ्या वर्गखोल्यांच्या जागेची पाहणी केली. उर्दू हायस्कूलमध्ये वर्गखोल्यांची कमतरता असल्याने विद्यार्थी व शिक्षकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन आ.आशुतोष काळे यांनी निधी उपलब्ध करून दिल्याने आता विद्यार्थ्यांना प्रशस्त वर्गखोल्या आणि अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा मिळणार आहेत. नवीन वर्गखोल्यांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळणार आहे त्याबद्दल मुस्लीम समाज बांधवांनी समाधान व्यक्त केले. यावेळी नगरसेवक हाजी मेहमूद सय्यद म्हणाले की, शिक्षणाच्या पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्याची काळे परिवाराची परंपरा यामुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे. यापूर्वी स्व. कर्मवीर शंकररावजी काळे यांनीही उर्दू हायस्कूलच्या वर्गखोल्यांसाठी निधी



उपलब्ध करून दिला होता. तसेच माजी आमदार अशोकराव काळे यांनी देखील मुस्लिम समाजाच्या मागणीनुसार वेळोवेळी निधी दिला होता. ही परंपरा आमदार आशुतोष काळे पुढे चालवत आहेत.

त्यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्वल करण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याच्या केलेल्या प्रयत्नांचे पालक व नागरिकांकडून स्वागत होत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी उपलब्ध होणाऱ्या या सुविधांचा उपयोग करून मनापासून अभ्यास करावा, उच्च शिक्षण घ्यावे आणि आपल्या आई–वडिलांसह कोपरगावचे नाव उज्ज्वल करावे. आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघातील मदरसा, कब्रस्तान, संरक्षण भिंत, कब्रस्तान सुशोभीकरण आणि नवीन कब्रस्तान यांसह मुस्लिम समाजाच्या विविध मूलभूत प्रश्नांकडेही गांभीर्याने लक्ष देऊन निधी उपलब्ध करून दिला आहे. अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल मुस्लिम समाजाच्या वतीने त्यांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले व यापुढेही मुस्लिम समाज आमदार आशुतोष काळे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# शिवसेना उबाठा गटाची जिल्हा प्रमुख सचिन कोतेंच्या उपस्थितीत बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** श्रावण मासानिमित्त श्री ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ग्रंथाचे रचनास्थान असलेल्या श्री क्षेत्र नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहांतर्गत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणास शनिवार (दि. २९ ऑगस्ट) रोजी उत्साहात प्रारंभ झाला असून, वारकरी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हा सोहळा शनिवार (दि. ५ सप्टेंबर)पर्यंत सुरू राहणार आहे.

वै. गु. ह.भ.प. बन्सी महाराज तांबे यांच्या प्रेरणेतून श्रीकृष्ण जयंती व संत ज्ञानेश्वर महाराज जयंतीनिमित्त हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख मार्गदर्शक ह.भ.प. वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली पारायण व धार्मिक कार्यक्रम सुरू आहेत.

दररोज पहाटे काकडा भजन व आरती, सकाळी ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण, प्रवचन, हरिपाठ, सायंकाळी हरिकीर्तन आणि रात्री हरिजागर असे विविध कार्यक्रम होत आहेत.

दि. ४ सप्टेंबर रोजी रात्री श्रीकृष्ण जन्माचे कीर्तन होणार असून, दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. भाविकांनी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळाने केले आहे.

# मुठेवाडगाव सोसायटीत नाट्यमय घडामोडी बनावट राजीनामा अर्जाचा आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव सोसायटीत बनावट राजीनामा अर्जावरून नाट्यमय घडामोडी घडल्या. आपल्या नावाने बनावट सही केलेला राजीनामा अर्ज विरोधकांनी सचिवांकडे दिल्याचा आरोप सोसायटीच्या चेअरमन ड्रका बाळकृष्ण मुठे यांनी केला आहे. त्यामुळे सोमवारी (दि. ३१ ऑगस्ट) झालेल्या मासिक सभेवर नऊ नव्हे, तर आठ सदस्यांनी बहिष्कार टाकल्याचा बनाव केल्याचे त्यांनी प्रसिद्धीपत्रकातून म्हटले आहे.

मुठे यांच्या म्हणण्यानुसार, ६ ऑगस्ट रोजी शिवाजी मुठे व बबन मुठे यांनी सोसायटीचे सचिव दत्तात्रय जासुद यांच्याकडे त्यांच्या नावाचा राजीनामा अर्ज दिला. त्यानंतर सभेचा अजेंडा काढण्यात आला. मात्र, माहिती मिळताच त्यांनी संचालकांसह सचिवांकडे लेखी अर्ज देऊन आपण राजीनामा दिलेला नसल्याचे स्पष्ट केले. सचिवांनी दाखविलेल्या अर्जावरील सही आपली नसून तो बनावट असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे राजीनामा मंजुरीसाठी काढण्यात आलेला अजेंडा रद्द करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, पुढील बैठक ३ सप्टेंबर रोजी होणार आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ. शंकरराव मुठे यांना एकटे पाडण्यासाठी विरोधकांकडून बदनामी केली जात असल्याचा आरोपही ड्रका मुठे यांनी केला. गावातील विविध विकासकामांसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे यांच्या माध्यमातून निधी मिळवून दिल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

# फुले हरित अभियानातून पर्यावरण संवर्धनाची व्यापक चळवळ उभारणार !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या वतीने 'फुले हरित अभियान' या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यांत दरवर्षी हे अभियान राबवून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यावेळी डॉ. विलास खर्चे म्हणाले, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी वृक्षलागवड अत्यंत महत्त्वाची आहे. 'फुले हरित अभियान'च्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाची व्यापक लोकचळवळ उभी करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. विस्तार शिक्षण संचालनालयाच्या वतीने आयोजित या अभियानांतर्गत मध्यवर्ती रोपवाटिका, गो संशोधन व विकास प्रकल्प तसेच मेंढी प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावर वृक्षलागवड करण्यात आली. विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसरात आतापर्यंत ८ हजारांहून अधिक वृक्षांची लागवड झाली असून, कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यांत ५० हजारांहून अधिक वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

यावेळी संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कुलसचिव राजेंद्रकुमार पाटील, नियंत्रक डॉ. सचिन नांदगुडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. मेंढी प्रकल्पाचे प्रमुख डॉ. रवींद्र निमसे यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी वृक्षलागवडीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. अभियानाचे नियोजन डॉ. मृणाल आजोतीकर व डॉ. मनोहर धादवड यांनी केले.

# ईद-ए-मिलादनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** ईद–ए–मिलादुन्नबी (पैगंबर जयंती) निमित्त आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव तालुका मुस्लिम विकास कमिटी आणि डी सरकार ग्रुपच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविण्यात आले. शहरातील विविध शाळांमधील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच गरीब व गरजू नागरिकांना ब्लँकेटचे वितरण करण्यात आले.



कोपरगाव शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोर्डिंग, श्री चक्रधर स्वामी शाळा, गीता प्रशाला, उर्दू शाळा (कोर्ट रोड), नगरपरिषद शाळा क्रमांक ६, उर्दू अँग्लो हायस्कूल तसेच मदरसा शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिलसह आवश्यक शालेय साहित्य देण्यात आले. साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासोबतच गरजू नागरिकांना मदतीचा हात देणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. ईद–ए–मिलादच्या माध्यमातून शांतता, बंधुभाव, सामाजिक एकता आणि मानवसेवेचा संदेश देण्यात आला. समाजातील सर्व घटकांनी परस्पर प्रेम, सलोखा व बंधुभाव कायम ठेवून एकोप्याने वाटचाल करावी, असे आवाहन आयोजकांनी केले.

यावेळी आमदार आशुतोष काळे यांच्या वतीने कोपरगाव शहर व तालुक्यातील नागरिकांना ईद–ए–मिलादुन्नबीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. मुस्लिम विकास कमिटीचे संस्थापक नगरसेवक हाजी महेमुद सय्यद, आयुब शेख, साजिद शेख, अमजद पठाण, डी सरकार ग्रुपचे अध्यक्ष नाजिम शेख, युसुफ शेख, आदिल सय्यद, सोनू शेख, अनिस पठाण, सिद्धार्थ शेळके, नितीश बोरुडे, अक्षय आंग्रे, जुनेद तांबोळी, वसीम शेख, अतिक शेख व शफीक शेख आदींनी उपक्रमासाठी सहकार्य केले. विद्यार्थी, पालक व नागरिकांनी उपक्रमाचे स्वागत केले.

# शिवसेना उबाठा गटाची जिल्हा प्रमुख सचिन कोतेंच्या उपस्थितीत बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसैनिकांची उत्तर जिल्हाप्रमुख सचिन कोते पाटील व जगदीश चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत नेवासा येथे आयोजित बैठकीस निष्ठावंत शिवसैनिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.निष्ठावंत शिवसैनिकांना उभारी देऊन त्यांच्याच जोरावर नेवासा तालुक्यात शिवसेना तळागाळात नेण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

नेवासा येथील शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार यांच्या निवासस्थान मधील अतिथी सभागृहात आयोजित शिवसेनेच्या बैठकीस शिवसेना उत्तर जिल्हा प्रमुख सचिन कोते, जिल्हा प्रमुख जगदीश चौधरी, जिल्हा संघटक अमोल बो–हाडे, जेष्ठ शिवसैनिक मालोजीराव गटकळ, राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार, तालुका प्रमुख मच्छिंद्र म्हस्के, तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण, सारंग फोफसे, नारायण लष्करे, अशोक उपळकर, माजी शहरप्रमुख अंबादास लष्करे, बाबासाहेब गोल्हार, माजी उपसरपंच गोरख घुले, राहता तालुका प्रमुख संदीप विघे, कैलास लष्करे यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

उबाठा शिवसेना जिल्हा प्रमुख जगदीश चौधरी म्हणाले की सामान्य शिवसैनिक जागेवरच असून कोणीही कुठे गेले नाही, नेवासा तालुक्यात निष्ठावंत शिवसैनिक अजून एकनिष्ठपणे उद्धवजी ठाकरे साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून त्यासाठी नेवासा तालुक्यात कार्यकारिणी निर्माण करा,पदाधिकाऱ्यांची पदे तुम्ही निश्चित करा,गाव तेथे शाखा प्रमुख नेमा आम्ही तुम्ही सांगाल त्या पद्धतीने नियुक्ती करू अशी ठामपणे भूमिका स्पष्ट केली.



अहिल्यानगर जिल्हा उत्तर जिल्हा प्रमुख सचिन कोते पाटील म्हणाले, ठाकरे गट फुटला याचे अवसान पसरले गेले,तसे पाहिले तर सच्चे शिवसैनिक आहे त्याच ठिकाणी असून ते उद्धव ठाकरे यांच्या सोबतच आहे. जिल्ह्यात सर्वांना एकत्रित करून त्यांच्या पाठीशी ताकद उभी करू, जिल्हयात जास्तीत जास्त आमदार व स्थानिक स्वराज्य संस्थेत आपलेच शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक पदावर असतील असा एक आदर्श निर्माण करू,असे संघटन उभे करू असा निर्धार केला.

यावेळी जेष्ठ शिवसैनिक मालोजीराव गटकळ, राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार,निष्ठावंत शिवसैनिक गोरखभाऊ घुले पाटील,गंगाधर पवार,नारायण लष्करे, मुन्ना चक्रनारायण,बालू जिरे, राजेंद्र राऊत,युवा सेनेचे कैलास लष्करे,यश गवळी,इंजिनिअर अथर्व पोतदार यांनी मनोगत व्यक्त करतांना आता एकतेची वज्रमुठ बांधून शिवसैनिकांना उभारी देण्याचे काम करावे त्यासाठी आम्ही खंबीरपणे आपल्या पाठीशी उभे राहू असे स्पष्ट केले.शिवसेनेचे युवा नेते नारायण लष्करे यांनी उपस्थित शेकडो शिवसैनिकांचे आभार मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# पान १ वरुन

## भुईकोट किल्ला विकासाला गती

कामांमध्ये बुरुज क्रमांक १ ते ११ पर्यंत सुमारे १३७० मीटर लांबीचा नेचर वॉकवे प्रस्तावित आहे. किल्ला परिसरात सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी मुक्त नाट्यगृह उभारण्यात येणार असून, परिसरातील प्रकाशव्यवस्था सुधारण्यासाठी सोलर स्ट्रीट लाईटिंग करण्यात येणार आहे. ऐतिहासिक वारसा जपत पर्यटनाला नवी दिशा भुईकोट किल्ला हा अहिल्यानगरच्या इतिहासातील महत्त्वाचा वारसा आहे. त्यामुळे या विकास प्रकल्पात किल्ल्याचे मूळ ऐतिहासिक स्वरूप आणि वास्तूचे महत्त्व जपत पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. किल्ल्याच्या संवर्धनासोबत पर्यटकांसाठी सुविधा उपलब्ध झाल्याने भविष्यात भुईकोट किल्ला अहिल्यानगरच्या पर्यटन विकासाचे महत्त्वाचे केंद्र बनण्याची अपेक्षा आहे. सामंजस्य करार झाल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीला वेग येणार असून, संबंधित विभागांच्या आवश्यक परवानग्या आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. भारतीय पुरातत्त्व विभाग, वन विभाग, पर्यावरण विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आवश्यक मान्यतांचाही त्यात समावेश आहे. घोषणेपासून मंजुरीपर्यंत आणि प्रशासकीय प्रक्रियेपासून आता सामंजस्य करारापर्यंत पोहोचलेल्या या महत्त्वाकांक्षी भुईकोट किल्ला विकास प्रकल्पाला अखेर प्रत्यक्ष अंमलबजावणीची दिशा मिळाली आहे. पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अहिल्यानगरच्या ऐतिहासिक वैभवाला पर्यटन विकासाची जोड मिळणार असून, भुईकोट किल्ल्याचे रूपडे बदलण्याच्या दिशेने निर्णायक पाऊल पडले आहे.

## कुकडीसाठी ५ हजार ७०४ कोटींची मान्यता

नियमित पाण्याचा आधार मिळाल्यास पीक पद्धतीत बदल होण्याबरोबरच शेती उत्पादन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, दक्षिण अहिल्यानगरच्या दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचा पाणीप्रश्न हा अनेक वर्षांपासूनचा विषय आहे. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर, पावसाळ्यातील अतिरिक्त पाणी अडविणे आणि ते दुष्काळी भागाकडे वळविणे या दृष्टीने डिंबे माणिकडोह बोगदा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. डिंबे धरणातील अतिरिक्त पाणी माणिकडोहकडे वळविल्यानंतर त्याचा उपयोग कुकडी डावा कालवा आणि त्याखालील लाभक्षेत्रासाठी करता येणार आहे. त्यामुळे सिंचनासाठी उपलब्ध पाण्यात वाढ होऊन दक्षिण नगरच्या दुष्काळी पट्ट्याला मोठा दिलासा मिळेल. दक्षिण नगरला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. ओव्हरब्रिज, साकळाई योजनेनंतर आता डिंबे माणिकडोह बोगद्याचा निर्णय झाला आहे. कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित खर्चालाही मोठी मान्यता मिळाल्याने सिंचनाचा प्रश्न अधिक व्यापक पद्धतीने मार्गी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी पुढील पाठपुरावाही केला जाईल, असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

## सरकारी कार्यक्रमांमध्ये मिळणार आरोग्यदायी अन्नपदार्थ

करावेत.आरोग्यदायी मेनू निश्चित करताना खउचठ-छखछ यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग करता येणार आहे.मंत्रालयातील उपहारगृहात सध्या फळे, उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य, पोहे, इडली-सांबार, गरम दूध आणि ग्रीन टी यांसारखे आरोग्यदायी पदार्थ उपलब्ध करून देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे अल्पोपहारातील तेलकट खाद्यपदार्थांचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली असून, डाळ, उसळ, पालेभाजी, ताक, कोशिंबीर, पुलाव यांसारख्या पौष्टिक पदार्थांचाही जेवणात समावेश करण्यात येत आहे. आरोग्यदायी मेनू निश्चित करताना खउचठ-छखछ यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उपयोग करता येणार आहे.मंत्रालयातील उपहारगृहात सध्या फळे, उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य, पोहे, इडली-सांबार, गरम दूध आणि ग्रीन टी यांसारखे आरोग्यदायी पदार्थ उपलब्ध करून देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे अल्पोपहारातील तेलकट खाद्यपदार्थांचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली असून, डाळ, उसळ, पालेभाजी, ताक, कोशिंबीर, पुलाव यांसारख्या पौष्टिक पदार्थांचाही जेवणात समावेश करण्यात येत आहे.

## धरणे भरुनही मराठवाड्यावर जलसंकट!

आणि पिण्याच्या पाण्याची चिंता मोठ्या प्रमाणात दूर झाली आहे. मात्र दुसरीकडे दक्षिण अहिल्यानगरमधील सीना, खैरी, मांडोहोळ आणि घाटशीळ पारगाव या प्रकल्पांमधील पाणीसाठा अत्यंत कमी आहे. या प्रकल्पांमध्ये सरासरी केवळ ३२ टक्क्यांच्या आसपास साठा असल्याने दक्षिणेकडील भागासाठी उर्वरित पावसाळा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. सीना धरणात ४०.५४ टक्के पाणीसाठा असला तरी खैरीमध्ये केवळ १८.०८ टक्के, मांडोहोळमध्ये १७.८५ टक्के आणि घाटशीळ पारगावमध्ये अवघा १२.३६ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे उत्तर आणि दक्षिण अहिल्यानगरच्या जलस्थितीतील मोठी तफावत स्पष्टपणे समोर आली आहे. जायकवाडी धरणातील पाणीसाठा ६५ टक्क्यांच्या निर्धारित पातळीच्या पुढे गेल्याने समन्यायी पाणी वाटपाच्या दृष्टीने अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील धरणसमूहांतून पाणी सोडण्याची गरज सध्या उरलेली नाही. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी आणि जलव्यवस्थापनाशी संबंधित यंत्रणांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, संगमनेर तालुयातील दुष्काळी निमोण-तळेगाव परिसरासाठी महत्त्वाच्या असलेल्या भोजापूर धरणातही शंभर टक्के पाणीसाठा झाला आहे. धरणातील अतिरिक्त पाणी पाझर तलाव, लघुपाटबंधारे तलाव, गाव तलाव तसेच दगडी आणि काँक्रीट बंधारे भरण्यासाठी सोडण्यात येत असल्याने वंचित भागातील पाणीटंचाई कमी होण्यास मदत होणार आहे. राज्यात सर्वाधिक उपयुक्त पाणीसाठा कोकण विभागात ९०.८४ टक्के, त्याखालोखाल पुणे विभागात ८९.९६ टक्के आहे. जलसंपत्ती अभ्यासक इंजि. हरिश्चंद्र र. चकोर यांच्या मते, राज्यातील एकूण जलस्थिती समाधानकारक असली तरी मराठवाड्यातील कमी पाणीसाठा आणि दक्षिण अहिल्यानगरमधील धरणांची स्थिती ही आगामी काळात विशेष लक्ष देण्याची बाब आहे. उर्वरित पावसाळा आणि परतीच्या पावसामुळे या भागातील धरणांमध्ये अपेक्षित आवक झाल्यासच सध्याची चिंता पूर्णपणे दूर होऊ शकेल.

# दादांच्या राष्ट्रवादीला वैजापुरात नवा चेहरा !

## डॉ. अमोल अन्नदाते यांचा समर्थकांसह पक्षप्रवेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** गेल्या काही वर्षांपासून सामाजिक आणि आरोग्य क्षेत्राच्या माध्यमातून वैजापूर तालुक्यात स्वतंत्र ओळख निर्माण करणारे प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. अमोल अन्नदाते यांनी अखेर सक्रिय राजकारणात उडी घेतली. मंगळवारी मुंबईत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. सुशिक्षित चेहरा, अभ्यासू मांडणी आणि प्रभावी वक्ता अशी ओळख असलेल्या अन्नदाते यांच्या प्रवेशाने वैजापूरच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली असून, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला तालुक्यात आगामी काळासाठी नवा चेहरा मिळाल्याचे मानले जात आहे. डॉ. अन्नदाते गेल्या काही वर्षांपासून 'आरोग्यवारी'च्या माध्यमातून तालुक्यातील ११६ गावांत पोहोचले. गावागावांत विनामूल्य आरोग्यसेवा देत त्यांनी ग्रामीण भागाशी थेट संपर्क निर्माण केला. त्यामुळे ते सक्रिय राजकारणात उतरणार का आणि उतरल्यास कोणत्या पक्षाची निवड करणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. अखेर त्यांनी राष्ट्रवादीची वाट निवडत या चर्चांना पूर्णविराम दिला. मुंबईतील प्रवेश सोहळ्याला आमदार सतीश चव्हाण, दिलीप बनकर यांच्यासह दत्तू पाटील, पंकज ठोंबरे, सूरजनाना पवार, बाळासाहेब भोसले, राहुल लांडे, अमृत शिंदे, रजा पठाण यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**२०२९साठी आतापासूनच 'चेहरा' तयार?**

आमदार सतीश चव्हाण गेल्या वर्षभरापासून डॉ. अन्नदाते यांच्या संपर्कात असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. दुसरीकडे ११६ गावांतील आरोग्यवारीमुळे अन्नदाते यांनी आधीच ग्रामीण भागात संपर्काचे जाळे उभे केले आहे. त्यामुळे त्यांचा प्रवेश केवळ पक्षबदलापुरता मर्यादित नसून २०२९च्या विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादीने वैजापुरात आतापासूनच नवा चेहरा पुढे आणल्याची चर्चा रंगू लागली आहे. आगामी काळात त्यांच्यावर पक्ष कोणती जबाबदारी सोपवतो, याकडे आता लक्ष लागले आहे.




## फादर प्रकाश राऊत यांना राज्यस्तरीय इच्छापूर्ती गौरव पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** येथील ज्ञानमाऊली चर्चचे निर्माते व ख्रिस्ती धर्मगुरू फादर प्रकाश राऊत यांनी धार्मिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय प्रेरणादायी व समाजोपयोगी कार्याबद्दल तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना देवळाली प्रवरा येथील इच्छापूर्ती प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय इच्छापूर्ती गौरव पुरस्कार शिर्डी येथे झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. देवळाली येथील इच्छापूर्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह. भ. प.संपतकाका जाधव,उपाध्यक्ष गणेश दादा भांड, दत्ता गागरे, सचिव राज्यस्तरीय पुरस्कार प्रमुख गोपाल शिंदे यांच्या उपस्थितीत सदरचा पुरस्कार फादर प्रकाश राऊत यांना प्रदान करण्यात आला.फादर प्रकाश राऊत यांनी राष्ट्रीय ऐक्याचे प्रतिक ठरलेल्या ज्ञानमाऊली चर्चची निर्मिती नेवासा येथे केली होती. पुरस्काराबद्दल राज्यस्तरीय पुरस्कारा बद्दल त्यांचे जर्मनी येथील उद्योजक व सोशल वर्कर डॉ.पेत्रा कार्कविल,सर्वपक्षीय नेते पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

## रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी घोडेगावात ग्रामस्थांचे बेमुदत उपोषण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**गंगापूर :** गंगापूर तालुक्यातील घोडेगाव ते तांदुळवाडी, डोमेगाव तसेच परिसरातील इतर रस्त्यांचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करावे, या मागणीसाठी घोडेगाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मंगळवार (दि. १ सप्टेंबर)पासून बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे. घोडेगाव ते तांदुळवाडी या पाच किलोमीटर रस्त्याचे डांबरीकरण होऊन सुमारे ३० वर्षे झाली आहेत. सध्या या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहतूक धोकादायक बनली आहे. तसेच डोमेगाव ते घोडेगाव रस्त्याचे काम तीन-चार वर्षांपूर्वी सुरू झाले; मात्र अद्याप ते अपूर्ण आहे. त्यामुळे तांदुळवाडी-घोडेगाव-डोमेगाव रस्त्याचे रुंदीकरण करून सिमेंट काँक्रिटीकरण करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याशिवाय घोडेगाव ते कनकोरी, सिद्धनाथ वाडगाव, खादगाव आणि पळसगाव या प्रत्येकी दोन किलोमीटर रस्त्यांचेही मजबुतीकरण व डांबरीकरण करावे, अशी मागणी आहे. हे रस्ते शेतकरी, विद्यार्थी व कामगारांसाठी महत्त्वाचे आहेत. गावांना जोडणाऱ्या या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## निधन

### आप्पासाहेब पवार



**कोल्हार :** राहता तालुक्यातील हनुमंत गाव येथील सामाजिक कार्यकर्ते आप्पासाहेब रामचंद्र पवार (वय ७८ ) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात एक मुलगा तीन मुली नातवंडे सून जावई असा मोठा परिवार आहे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेजचे प्राचार्य रामनाथ आप्पासाहेब पवार यांचे ते वडील होत.

### सुरेश आदिक



**माळवाडगांव :** श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर येथील प्रगतशील शेतकरी सुरेश आप्पादेव आदिक ( वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी , दोन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार असून, खानापूर सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य माजी चेअरमन निलेश आदिक व संदीप आदिक यांचे वडील होत.

## श्रावणानिमित्त नागमठाण ते काटेपिंपळगाव कावड यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर:** पवित्र श्रावण महिन्याचे औचित्य साधून जय बाबाजी फक्त परिवार व महिला मंडळाच्या वतीने नागमठाण येथील गोदावरी नदीपासून काटेपिंपळगाव येथील श्री काटेश्वर महादेव मंदिरापर्यंत भव्य कावड यात्रेचे मा.सरपंच मनीषाताई व्यवहारे, यांच्या नेतृत्वाखाली आयोजन करण्यात आले होते. श्रावण महिन्यात भगवान महादेवाला जलाभिषेक



करण्याची परंपरा असून, या धार्मिक भावनेतून भाविकांनी मोठ्या उत्साहात कावड यात्रेत सहभाग घेतला. गोदावरी नदीचे पवित्र जल कावडीत घेऊन भाविकांनी भक्तिमय वातावरणात काटेश्वर महादेव मंदिराकडे प्रस्थान केले. यावेळी सर्व भाविकांनी महादेवाचे दर्शन घेऊन सुख, समृद्धी व आरोग्यासाठी प्रार्थना केली. श्रावण महिन्यातील या कावड यात्रेच्या माध्यमातून धार्मिक परंपरा, सामाजिक एकोपा आणि भक्तीभाव जोपासण्याचा सुंदर संदेश देण्यात आला. यावेळी मा. सरपंच मनीषाताई व्यवहारे, सुषमा डांगरे,दुर्गा गायकवाड, आशाबाई फिपाळे, शोभा शेळके, गायत्री सोमवंशी, कल्पना मेंढे आदी महिला मंडळाच्या व जय बाबाजी फक्त परिवार यांच्या या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक करण्यात आले आहे.

## जरांगेंच्या उपोषणाला समर्थन लाडगाव येथे रास्ता रोको

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** तालुक्याचे मराठा समन्वयक प्रशांत पाटील सदाफळ यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला मोठ्या संख्येने मराठा बांधवांसह इतर समाजबांधवांनीही उपस्थित राहून पाठिंबा दिला.विशेष म्हणजे मुस्लिम समाजाच्या वतीनेही आंदोलनाला समर्थन देण्यात आले. यावेळी विरगाव पोलीस ठाण्याच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान, सुमारे २५ ते ३० मिनिटे रास्ता रोको करण्यात आला. यावेळी वांजरगाव-वैजापूर मार्गावरील एसटी बसही काही काळ रोखण्यात आली. आंदोलन शांततेत पार पडल्यानंतर रास्ता रोको मागे घेण्यात आला आणि या मार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत सुरू झाली.



## शहापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी कविता घारे बिनविरोध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील शहापूर ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच सौ. निशा खंडीझोड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंचपदी काळे गटाच्या सौ. कविता अंकुश घारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

शहापूर ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठीची निवडणूक प्रक्रिया नुकतीच सरपंच सौ. योगिता डांगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपसरपंचपदासाठी निर्धारित वेळेत सौ. कविता घारे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्यामुळे निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत असलेले ग्रामसेवक शिवाजी सोमवंशी यांनी सौ. कविता घारे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.




यावेळी सरपंच, सर्व सदस्य, काळे गटाचे कार्यकर्ते व कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे माजी. व्हा. चेअरमन प्रवीण शिंदे यांनी नवनिर्वाचित उपसरपंच सौ. कविता घारे यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सरपंच सौ. योगिता डांगे, मावळत्या उपसरपंच सौ. निशा खंडीझोड, सर्व ग्रा.प.सदस्य, सागर घारे, रामनाथ घारे, राजेंद्र पाचोरे, रमेश डांगे, वसंत पाचोरे, जनार्दन पाचोरे, अशोक डांगे, गणेश घारे, पोपट घारे, वाल्मिक घारे, गोविंद पाचोरे, अंकुश घारे, नवनाथ डांगे, सुनीता डांगे आदी मान्यवरांसह काळे गटाचे कार्यकर्ते व शहापूर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**change of name**

I HAVE CHANGE OLD NAME
IN MY ASPAK BADSHAHA SAYYAD (BEFORE NAME) TO NEW NAME AS (AFTER NAME) ASHAPAK BADSHAH SAYYAD (AADHAR CARD NO.2061 4238 1364) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SONAI PLACE- SONAI
DATE- 01/09/2026

**change of name**

I HAVE CHANGE OLD NAME
IN MY SALLU MANSUNALI IRANI SALLU MANSURAALI IRANI (BEFORE NAME) TO NEW NAME AS (AFTER NAME) SALU MANSURALI IRANI (PASSPORT NO. K5476630) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC PUNE PLACE- PUNE
DATE- 01/09/2026

**change of name**

I HAVE CHANGE MY OLD NAME SITADEVI CHINTAMANI PANDEY (BOARD CERTIFIACTE) (BEFORE NAME) TO NEW NAME AS SITA CHINTAMANI PANDEY (AADHAR NO. 2139 4798 3802) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHIRDI PLACE: SHIRDI
DATE: 02/09/2026

**नावात बदल**

माझे लग्न पूर्वीचे नाव अंकिता अशोक गाडेकर असे असून लग्नानंतर ते बदलून सौ अंकिता भूषण लुटे असे नवे नाव झाले आहे. दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून इतर दुसरी व्यक्ती कोणी नाही. प्रतिज्ञापत्र क्र २६५२२४२०४१२६८१००७१४५२६
दिनांक ०१/०९/२०२६

**हरवले आहे**

कुमारी आनंदी पराग जगताप राहणार राहता हिचे नावाचा समता इंटरनॅशनल स्कूल कोकमठाण या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला ऑगस्ट महिन्यात हरवला आहे कोणास सापडल्यास खालील नंबर वर संपर्क करावा .
मो नं ९८२२७८००४८

**Change of name**

I SONAVANE BAJIRAV BALASAHEB declare that my name is mentione as SONAVANE BAJIRAV BALASAHEB in my school leaving certificate However,in my Aadhar and PAN card , It is written as BAJIRAV BALU SONAVANE. Both names belong to one and the same person.
Date-01/09/2026


## ई-पीक पाहणी करणाऱ्या सहाय्यकांना मानधनात वाढ करण्याची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर:** ई-पीक पाहणी कामासाठी मिळणारे प्रति प्लॉट १० मानधन अत्यल्प असून,सहाय्यकांना येणाऱ्या विविध अडचणी व जीवितास असलेला धोका लक्षात घेऊन मानधन वाढविण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. गंगापूर येथील तहसीलदार नवनाथ वगवाड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की ई-पीक पाहणी सहाय्यक शासनाच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष जाऊन ई-पीक पाहणीचे काम जबाबदारीने काम करत आहे. मात्र, सदर कामासाठी मिळणारे प्रति प्लॉट केवळ १०मानधन हे अत्यंत कमी असून, प्रत्यक्ष कामाचा खर्च,वेळ, श्रम आणि शेतामध्ये येणाऱ्या धोक्यांचा विचार करता हे काम आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. यासह अनेक मागण्याचे निवेदन सहाय्यकांनी तहसीलदार यांना सादर केले आहे.यावेळी वाल्मीक सिरसाट,अबुजर ईनामदार,विनोद बिरुटे ,प्रमोद पदार ,श्रीराम साळुंके,रवींद्र काकडे ,गणेश गंगुले ,कृष्णा चव्हाण ,विशाल राऊत ,सुदर्शन गायकवाड ,विजय निळे ,गणेश पेरकर , नितीन टेकणे आदींची उपस्थिती होती.



## वांबोरी शासकीय लिफ्ट योजनेला मिळणार नवसंजीवनी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेली वांबोरी शासकीय लिफ्ट योजना पुन्हा सुरू होण्याच्या आशा निर्माण झाल्या आहेत. याबाबत लाभधारक शेतकऱ्यांनी दि. ३० ऑगस्ट रोजी ज्येष्ठ नेते सुभाषरावजी पाटील यांची भेट घेऊन योजना पुन्हा सुरू करण्याबाबत चर्चा केली. यावेळी सुभाषरावजी पाटील यांनी सांगितले की, ही योजना पुन्हा सुरू करण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून आपले प्रयत्न सुरू आहेत. आता योजनेचा नव्याने सर्वे करण्यात येणार असून, सर्वेक्षणानंतर योजना सुरू करण्यासाठी पुढील प्रक्रिया केली जाणार आहे. यावेळी पाटील यांनी शासकीय लिफ्ट योजनेचे ओएसडी सानप यांच्याशी मोबाईलवरून संपर्क साधला. स्पीकरवरून झालेल्या चर्चेत सानप यांनी लाभधारक शेतकऱ्यांना योजनेच्या सद्यस्थितीची माहिती दिली. दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सर्वेक्षणासाठी निधी मंजूर करण्याबाबत बैठक होणार असून, त्यानंतर योजनेचा सर्वे केला जाईल. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर लिफ्ट योजना पुन्हा सुरू करण्याची पुढील कार्यवाही सुरू केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली. लिफ्ट योजना अनेक वर्षांपासून बंद असल्याने परिसरातील शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे योजना लवकरात लवकर सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी लाभधारकांनी केली. यावेळी श्याम पटारे, सुरज शर्मा, बंडू मोरे, सचिन गडाख, महेश मोरे, संदीप पटारे, केरू बापू साळुंके, संदीप कार्ले, नितीन मोरे, राजीव मोरे, रोहिदास कुऱ्हे, महादू ढोके, दत्तात्रय गांधले, आबा पाटील यांच्यासह लाभधारक शेतकरी उपस्थित होते. योजना पूर्णपणे सुरू होईपर्यंत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे, अशी विनंती यावेळी लाभधारकांनी सुभाष पाटील यांच्याकडे केली.




## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 883 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 788 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 233 48 279 | 246 25 258 | 248 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 898 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 568 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 468 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 448 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 598 48 134 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 17/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 24/08/2026 | 240 6 | | | | |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि. ०२ सप्टेंबर २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२६ ४६९ ९०० | ९-५ | २३० २०८ ७८० | जोड ७९-३९-४५-५७-८१ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| २४० २६८ ३३० | ६-८ | १२५ २६० ४४० | जोड १६-६४-२८-८०-५४ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| ३४५ ३९२ २०० | २-० | १९० २८० २४४ | जोड ६२-२१-९०-०८-५३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## दखल

### महागणेशोत्सव स्पर्धेसाठी गणेश मंडळांना आवाहन

**पुणे :** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या निर्णयानुसार गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत असून, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या वतीने 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

स्पर्धेसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत ७ सप्टेंबर २०२६ आहे. यंदा स्पर्धा तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा विविध स्तरांवर घेण्यात येणार आहे. तालुकास्तरावर प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये, जिल्हास्तरावर ५० हजार, ४० हजार व ३० हजार रुपये, तर राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनुक्रमे ७.५० लाख, ५ लाख व २.५० लाख रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत.

मंडळांचे १०० गुणांवर मूल्यांकन करण्यात येणार असून, कला व संस्कृतीचे जतन, निसर्ग व सार्वजनिक संपत्तीचे संवर्धन, सामाजिक कार्य तसेच गणेशोत्सवाचे विधायक व पर्यावरणपूरक आयोजन या बाबींना प्रत्येकी २० गुण देण्यात येणार आहेत. यामध्ये पारंपरिक कलांचे सादरीकरण, ग्रंथालय, कवी संमेलन, स्वच्छता व पर्यावरण जनजागृती, आरोग्य शिबिरे, रक्तदान, महिला व दिव्यांगांसाठी उपक्रम, पर्यावरणपूरक मूर्ती व सजावट, भाविकांसाठी पाणी व प्राथमिक उपचार सुविधा तसेच कार्यकारिणीत महिलांचा किमान ३० टक्के सहभाग यांचा विचार केला जाणार आहे.

इच्छुक मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी सरपशीर्हीरीं.श्रिवाझर.ले.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

### व्यावसायिक वाहन कर्जासाठी संत सोपानकाका बँकेचा ८.७५ टक्के व्याजदर




**सासवड :** लहान-मोठे उद्योग, व्यवसाय तसेच वाहतूक व्यवसायासाठी व्यावसायिक वाहन घेऊ इच्छिणाऱ्या तरुण, शेतकरी, वाहतूकदार आणि सर्वसामान्यांसाठी संत सोपानकाका सहकारी बँकेने वाहन कर्ज योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत व्यावसायिक वाहन कर्ज केवळ ८.७५ टक्के व्याजदरापासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

संस्थापक सहकाररत्न चंदुकाका जगताप यांच्या 'सहकारातून समृद्धी' या विचारातून आणि आमदार संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली बँक गेली २९ वर्षे ग्राहकांच्या सेवेत कार्यरत आहे. 'आपली बँक, संत सोपानकाका बँक' हे ब्रीद जपत बँकेने ग्राहकांच्या हिताला प्राधान्य दिले आहे.

पिकअप, छोटा हत्ती, मालवाहू टेम्पो यांसह विविध व्यावसायिक वाहनांसाठी कर्ज सुविधा उपलब्ध असून, प्रक्रिया सुलभ आणि जलद पद्धतीने करण्यात येत असल्याचे बँकेकडून सांगण्यात आले. बँकेच्या शाखांमध्ये डिजिटल व्यवहाराची सुविधाही उपलब्ध आहे.

व्यवसायाला नवी गती देण्यासाठी तसेच स्वतःचे व्यावसायिक वाहन घेण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ग्राहकांनी जवळच्या संत सोपानकाका सहकारी बँकेच्या शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन बँक प्रशासनाने केले आहे.

### साई सेवा हॉस्पिटलच्या नोंदणीवर प्रश्नचिन्ह; उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**बारामती :** रुग्णाला उपचारासाठी दाखल करून घेण्यास कथित टाळाटाळ व हलगर्जीपणा केल्याच्या आरोपामुळे चर्चेत आलेल्या साई सेवा हॉस्पिटलच्या नोंदणी व नूतनीकरण प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी सुधाकर बोराटे यांनी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे केली आहे.

१९ एप्रिल २०२५ रोजी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आलेल्या रुग्णाला दाखल करून घेण्यास टाळाटाळ झाल्याचा आरोप आहे. त्यानंतर नातेवाईकांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन डॉक्टर व कर्मचाऱ्यांशी वाद घातल्याची तसेच मारहाणीची घटना घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी डॉक्टर प्रदीप दडस यांनी २० एप्रिल रोजी इंदापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.

दरम्यान, हॉस्पिटलच्या नोंदणीसाठी २१ एप्रिल २०२५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आणि २२ एप्रिल रोजी नोंदणी अथवा नूतनीकरण मंजूर झाल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. प्रस्तावातील कागदपत्रांची सत्यता, प्रत्यक्ष हॉस्पिटल तपासणी व निरीक्षण अहवाल तयार करण्यात आला होता का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. सिद्धार्थ नामपल्ले व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ एम. पल्ले यांच्या भूमिकेचीही चौकशी करावी. बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट, १९४९ व महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०२१ यांचे पालन झाले का, याची तपासणी करून दोष आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी बोराटे यांनी केली आहे.

# पुण्यात सीएनजी दोन रुपयांनी महागले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पश्चिम आशियातील वाढलेला तणाव आणि त्याचा परिणाम म्हणून हॉर्मुझ सामुद्रधुनीतून द्रवीभूत नैसर्गिक वायूच्या वाहतुकीत आलेल्या अडथळ्यामुळे जागतिक पातळीवर द्रवीभूत नैसर्गिक वायूच्या खुल्या बाजारातील दरात मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव आणि हिंजवडी परिसरातील वाहनांसाठीच्या संपीडित नैसर्गिक वायूच्या दरात प्रतिकिलो दोन रुपयांची वाढ जाहीर केली आहे.

नवीन दरानुसार संपीडित नैसर्गिक वायूचा किरकोळ विक्री दर ९७ रुपये ७५ पैसे प्रतिकिलो झाला असून, हा दर ३१ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून म्हणजेच १ सप्टेंबर २०२६ पासून लागू करण्यात आला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून पश्चिम आशियातील संकट पुन्हा तीव्र झाले असून, जुलै २०२६ पासून त्याचा द्रवीभूत नैसर्गिक वायूच्या जागतिक पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. हॉर्मुझ सामुद्रधुनी हा जागतिक ऊर्जा व्यापारातील महत्त्वाचा मार्ग असल्याने तेथून द्रवीभूत नैसर्गिक वायूच्या वाहतुकीवर परिणाम झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील या वायूच्या किमती संकटापूर्वीच्या तुलनेत जवळपास दुप्पट झाल्या आहेत. त्यातच आगामी हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर युरोपमध्ये नैसर्गिक वायूचा साठा वाढविण्याची लगबग सुरू असल्याने जागतिक बाजारावरील दबाव आणखी वाढला आहे.

त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढलेले दर आणि खुल्या बाजारातील द्रवीभूत नैसर्गिक वायूवरील वाढते अवलंबित्व यामुळे संपीडित नैसर्गिक वायूच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या वायूच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे.

या वाढत्या खर्चाचा पूर्ण भार ग्राहकांवर न टाकता महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने अतिरिक्त खर्चाचा मोठा हिस्सा स्वतःकडे घेतला असून, त्यातील केवळ काही भाग ग्राहकांवर टाकण्यात आला आहे. त्यामुळे सध्याची दरवाढ मर्यादित ठेवण्यात आल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

दरवाढीनंतरही पेट्रोल आणि डिझेलच्या तुलनेत संपीडित नैसर्गिक वायूमधून वाहनधारकांना आर्थिक बचत मिळत राहणार आहे. पुणे शहरातील सध्याच्या इंधन दरांचा विचार करता, प्रवासी कारसाठी संपीडित नैसर्गिक वायूमुळे पेट्रोलच्या तुलनेत सुमारे ४५ टक्के, तर डिझेलच्या तुलनेत सुमारे २३ टक्के बचत होत आहे. तीनचाकी रिक्षांसाठी ही बचत सुमारे २५ टक्के असल्याचे कंपनीने नमूद केले आहे.

दरम्यान, घरगुती वापरासाठी पाईपद्वारे पुरवठा होणाऱ्या नैसर्गिक वायूच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. हे दर पूर्वीप्रमाणेच कायम राहणार आहेत.

पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव आणि हिंजवडी परिसरातील संपीडित नैसर्गिक वायूच्या ग्राहकांनी नवीन दराची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने केले आहे.

## काकडे महाविद्यालयाच्या मुलींचा ज्युदोमध्ये सांघिक विजय



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** भारतीय जैन संघटना महाविद्यालय, वाघोली येथे झालेल्या पुणे जिल्हा आंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत मु. सा. काकडे महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने सांघिक विजेतेपद पटकावले. मुलांच्या संघाने सांघिक उपविजेतेपद मिळवले.

मुलींच्या गटात काजल जगताप (४८ किलो) व सायली जगताप (५७ किलो) यांनी प्रथम क्रमांक मिळवला. पोर्णिमा मोटे (५२ किलो), समर्था ठोंबरे (५७ किलो) आणि पूर्वा गोरे (६३ किलो) यांनी द्वितीय क्रमांक मिळवला.

मुलांच्या गटात प्रथमेश चाबुकस्वार (६० किलो) यांनी तृतीय, तर आदित्य पवार (७३ किलो), तानाजी घोरपडे (८१ किलो) आणि जय करचे (१०० किलो) यांनी द्वितीय क्रमांक मिळवला.

संस्थेचे अध्यक्ष सतीशराव काकडे-देशमुख, महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष अभिजीत काकडे-देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे आणि संस्थेचे सचिव सतीश लकडे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून श्रीगोंदा येथे होणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी विजयी खेळाडूंशी संवाद साधून त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीची माहिती घेतली. तसेच महाविद्यालयातर्फे खेळाडूंना अधिकाधिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. खेळाडूंना प्रा. डॉ. बाळासाहेब मरगजे आणि प्रा. दत्तराज जगताप यांचे मार्गदर्शन लाभले.

## टाकळी भीमा येथील १४ वर्षीय मुलगी बेपत्ता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**तळेगाव ढमढेरे :** टाकळी भीमा (ता. शिरूर) येथील चांदणी संदीप यादव (वय १४) ही अल्पवयीन मुलगी घरातून बेपत्ता झाल्याची घटना घडली. याबाबत तिचे वडील संदीप बनारसी यादव यांनी शिक्रापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

संदीप यादव कामानिमित्त बाहेर गेले असताना चांदणी घरात होती. दुपारनंतर ती अचानक घरातून निघून गेली. त्यानंतर ती घरी परतली नाही. कुटुंबीय व ग्रामस्थांनी परिसरात शोध घेतला; मात्र तिचा ठावठिकाणा लागला नाही.

बेपत्ता चांदणीचे वय १४ वर्षे असून, काळे व लांब केस, गोरा रंग, उंची पाच फूट, डाव्या कानाजवळ जन्मखूण अशी ओळख आहे. तिच्या अंगात पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट व काळ्या रंगाची नाईट पॅन्ट होती. तिला हिंदी व मराठी भाषा बोलता येते. चांदणीबाबत कोणाला माहिती मिळाल्यास शिक्रापूर पोलिस ठाणे : ९८२२४४७४४ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर करीत आहेत.

## जय हनुमान ज्येष्ठ नागरिक संघाची वार्षिक सभा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील जय हनुमान ज्येष्ठ नागरिक संघाची १६ वी वार्षिक सभा विठ्ठल मंदिरात उत्साहात झाली. सभेत वर्षभरातील विविध उपक्रमांचा आढावा घेऊन आगामी वर्षातील सामाजिक व विधायक उपक्रमांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, आरोग्यविषयक उपक्रम आणि सामाजिक सहभागाबाबत सदस्यांनी मते मांडली. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम केलेल्या मान्यवरांचा तसेच स्पर्धा परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

संघाच्या वतीने भक्त पुंडलिक पुरस्कार माजी प्राचार्य उत्तम आवारी यांना, तर श्रावण बाळ पुरस्कार प्रकाश दामू टाव्हरे यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ सल्लागार प्रतापराव वळसे पाटील, माजी सरपंच फकिरा वळसे पाटील, उद्योजक नामदेव थोरात, सरपंच रवि वळसे पाटील, कार्याध्यक्ष दिगांबर सुडके, दत्तात्रय टाव्हरे, माजी प्राचार्य पी. आर. हिंगे, प्राचार्य कांताराम टाव्हरे, प्रा. अरुण गोरडे, प्रसिद्ध निवेदिका मनिषा वळसे पाटील यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

अध्यक्ष बाजीराव वळसे पाटील यांनी प्रास्ताविक केले. सचिव डॉ. विलास वळसे पाटील यांनी अहवाल वाचन केले. सूत्रसंचालन उत्तम आवारी यांनी केले, तर आभार दामोदर ढवळे यांनी मानले.

## पुणे जिल्ह्यात २७ विशेष कार्यकारी दंडाधिकारी नियुक्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री


**पुणे :** आगामी गणेशोत्सव शांततेत व सुरळीत पार पडावा आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने २७ विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १४ अन्वये याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

पुणे जिल्ह्यात सार्वजनिक गणेशोत्सवाला १४ सप्टेंबरपासून सुरुवात होणार असून २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला गणेशोत्सवाची सांगता होणार आहे. विसर्जनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर मिरवणुका आणि नागरिकांची गर्दी होत असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.

जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, शिरूर, पुरंदर, बारामती, दौंड, इंदापूर, भोर, वेल्हा आणि हवेली तालुक्यांसह पुणे शहरातील विविध पोलिस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात हे अधिकारी कार्यकारी दंडाधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

विसर्जन मिरवणुका रात्री उशिरापर्यंत सुरू राहण्याची शक्यता असल्याने नियुक्त अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रात आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करून कायदा व सुव्यवस्था राखतील. एखादे पद रिक्त असल्यास संबंधित तहसीलदार किंवा कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना नजीकच्या नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडून अतिरिक्त कार्यभार देण्याचे निर्देशही आदेशात देण्यात आले आहेत.

## गणेश विसर्जन मिरवणुकीत लेझरला निर्बंध



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुका शांततेत पार पडाव्यात, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोका निर्माण होऊ नये, यासाठी १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान गणेश विसर्जन मिरवणुकीत लेझर लाईटचा वापर करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी याबाबत आदेश जारी केला आहे.

या आदेशाचे उल्लंघन करून विसर्जन मिरवणुकीत लेझर लाईटचा वापर करताना कोणी व्यक्ती, संस्था किंवा गणेश मंडळ आढळल्यास त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेतील कलम २२३ तसेच प्रचलित कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. संबंधितांनी आदेशाचे पालन करावे, असे प्रशासनाने कळविले आहे.

## वारकरी मसाज सेवेची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**भोर :** आषाढी वारीदरम्यान योग विद्या धाम पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'वारकरी मसाज सेवा' उपक्रमाची वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया मध्ये नोंद झाली. या उपक्रमात सहभागी झालेल्या सेवकांना वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

योगमहर्षी डॉ. कुवलयानंद यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त योग विद्या धाम भोर यांच्या वतीने गंगूताई पंतसचिव वाचनालय येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. विनया पुंडे आणि ह.भ.प. राजेंद्र महाराज शास्त्री उपस्थित होते. राजेंद्र महाराज शास्त्री यांनी योग व अध्यात्म, तर डॉ. विनया पुंडे यांनी डॉ. कुवलयानंद यांच्या जीवनकार्याची माहिती दिली.

११ जुलै रोजी आषाढी वारीदरम्यान योग विद्या धाम भोरच्या योगसाधकांनी वारकऱ्यांना मसाज सेवा दिली. या सेवेत संस्थापिका योगपंडित अनुराधा देवी, योगपंडित निर्मला किंद्रे, शहाजी लगड, डॉ. आनंद कंक, सागर शेटे, यशवंत भिलारे, रुपाली भेलके, सुवर्णा शिंदे, प्रज्ञा खांडेकर, कांचन कंक, वैष्णवी शेडगे, श्रावणी शेटे, सुलभा पाठक, भारती धोंडे, सविता दुधाने, अशोक भावेकर, शेखर धोंडे, अनिल एडवे, शंकर बरकडे, सुवर्णा मोघे, पल्लवी दिघे, मनीषा सोनवणे आणि कल्पना फुटाणे सहभागी झाले होते. त्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी सागर शेटे यांनी योगगीत सादर केले. सूत्रसंचालन सुनिता लगड यांनी केले, तर आभार योगेश शेडगे यांनी मानले.



वारकरी मसाज सेवा उपक्रमाची वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया मध्ये नोंद झाल्याबद्दल योगरत्न निर्मला किंद्रे यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करताना डॉ. विनया पुंडे.

# पाटसहून हाके यांच्या नेतृत्वाखाली ओबीसींचा मुंबईकडे मोर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाटस :** राज्यात आरक्षणाचा मुद्दा तापलेला असताना ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली दौंड तालुक्यातील पाटस येथून हजारो कार्यकर्त्यांसह महा एल्गार मोर्चा मुंबईच्या दिशेने रवाना झाला.

पोलिसांनी सुरुवातीला मोर्चाला परवानगी नाकारली होती. मात्र, कोणत्याही परिस्थितीत मुंबईला जाण्याची भूमिका हाके यांनी घेतली. पाटस टोलनाक्याजवळून मोर्चा रवाना होताना हाके यांनी पोलिसांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली.

आम्ही हक्काचे आरक्षण वाचवण्यासाठी शांततेत मुंबईला निघालो आहोत. पोलिसांनी त्यांचे काम करावे. गरज पडल्यास अटक करा, जेलमध्ये टाका; मात्र कोणत्याही परिस्थितीत आम्ही मुंबईला जाणार, अशी आक्रमक भूमिका हाके यांनी मांडली.

ओबीसी आमदार आणि नेते पक्षाचे गुलाम झाले असून त्यांना ओबीसींच्या प्रश्नांशी देणे-घेणे नाही, असा आरोपही त्यांनी केला. पदाची अपेक्षा नसून गावगाड्यातील आणि झोपडपट्टीत राहणाऱ्या ओबीसींच्या हक्कासाठी लढत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**दोन आंदोलनांमुळे सरकारसमोर आव्हान :**
**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईकडे जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याचवेळी ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा मुंबईकडे रवाना झाला आहे. त्यामुळे परस्परविरोधी आरक्षणाच्या मागण्यांची आंदोलने एकाचवेळी हाताळण्याचे आव्हान राज्य सरकारसमोर निर्माण झाले आहे. पाटसहून निघालेल्या आंदोलकांशी सरकार काय चर्चा करते, याकडे लक्ष लागले आहे.**



पाटस टोलनाक्याजवळ पोलिसांकडून मोर्चेकऱ्यांना ठिकठिकाणी अडविण्याचा प्रयत्न झाला. मात्र, इतरांना वेगळा न्याय आणि ओबीसींना वेगळा न्याय सहन केला जाणार नाही, असे हाके यांनी स्पष्ट केले. हजारो वाहनांचा ताफा मुंबईत धडकणार असून, १ सप्टेंबरला ओबीसींची ताकद सरकारला दाखवून देऊ, असा इशाराही त्यांनी दिला.

## खानवडी, फुले स्मारक विकासकामांना गती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**सासवड :** पुरंदर मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी भाजपाचे जिल्हा परिषद सदस्य अजय कैलास इंगळे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन विविध विकासकामांबाबत चर्चा केली.

खानवडी येथील महात्मा फुले स्मारकाचे काम, गावातील रस्ते तसेच चौक सुशोभीकरणाच्या कामांना गती देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या कामांसाठी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच कार्यवाही करण्याचे आश्वासन मंत्री गोरे यांनी दिले.

तसेच बेलसर-माळशिरस गटातील अनेक रस्त्यांची पावसामुळे दुरवस्था झाली असून, त्यांच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही मंत्री गोरे यांनी दिले. त्यामुळे या भागातील नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

पुरंदरच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असून, जनतेच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे भाजपाचे जिल्हा परिषद सदस्य अजय कैलास इंगळे यांनी सांगितले. महात्मा फुले स्मारक, खानवडी सुशोभीकरण आणि रस्त्यांची कामे मार्गी लागल्याने परिसराच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, सुधीर बाळकृष्ण घावरे राहणार मुक्काम पोस्ट विठ्ठलवाडी रोड, तालुका पौड, जिल्हा पुणे 412108 यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन नंबर MH-14-KN-3340 हे चारचाकी व MH-12-PP-5223, MH-12-VX-3964 या दोनचाकी नंबर असलेली वाहने त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती सुवर्णा सुधीर घावरे यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक-02/09/2026

**श्रीमती सुवर्णा सुधीर घावरे**
मुक्काम पोस्ट विठ्ठलवाडी रोड,तालुका पौंड, जिल्हा पुणे 412108.

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, केशवदास ताहिलराम मूलचंदानी राहणार प्लॉट नंबर 789 हिल टॉप कॉलनी, खंडाळा, लोणावळा, पुणे - 410301.

यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन नंबर MH-14-CK-2901 असा असून, सदर चार चाकी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार मुलगा श्री. संजय केशवदास मुलचंदानी यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून, पुढील पूर्तता करण्यात येईल. याची नोंद घ्यावी .

दिनांक-02/09/2026

**श्री. संजय केशवदास मूलचंदाणी**
प्लॉट नंबर 789, हिल टॉप कॉलनी, खंडाळा लोणावळा पुणे 410301.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## भरधाव टेम्पोने दुचाकीस्वारला चिरडले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**वैजापूर** : तालुक्यातील शिवराई येथे टेम्पोने दुचाकीस्वाराला जोरदार धडक देऊन चाकाखाली चिरडल्याची भीषण घटना सोमवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास घडली. या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ज्ञानेश्वर उर्फ गणेश सर्जे राव पठाडे (वय २५, रा. शिवराई) असे मृत तरुणाचे नाव आहे. गणेश हा सोमवारी सकाळी दुचाकीवरून शिवराई येथून पारसोडा रस्त्याने जात होता. याचदरम्यान टेम्पोने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर गणेश रस्त्यावर कोसळला आणि टेम्पोचे चाक त्याच्या अंगावरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला. या भीषण अपघातात त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातामुळे शिवराई परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी पोलिसांनी पुढील कारवाई सुरू केली आहे.

# पोलिसांसमोरच प्रसाद गुंजाळ यांना मारहाण

## आमदार अमोल खताळ समर्थक संदेश देशमुखविरुद्ध अदखलपात्र गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : मागील वर्षी आमदार अमोल खताळ यांना मारहाण केल्याच्या प्रकरणातील आरोपी प्रसाद आप्पासाहेब गुंजाळ (वय २८, रा. खांडगाव) यांना पोलिसांच्या ताब्यात असतानाच मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना सोमवारी (दि. ३१ ऑगस्ट) खांडेश्वर मंदिर परिसरात घडली. याप्रकरणी गुंजाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संदेश बाळासाहेब देशमुख (रा. राजापूर) याच्याविरुद्ध संगमनेर शहर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांत नोंदविलेल्या तक्रारीनुसार, सोमवारी सकाळी सुमारे १० वाजता प्रसाद गुंजाळ हे श्रावण महिन्यानिमित्त खांडेश्वर मंदिरात महादेवाच्या दर्शनासाठी गेले होते.

दर्शन घेतल्यानंतर ते मंदिराच्या गाभाऱ्याबाहेरील पटांगणात बसले होते. त्यावेळी पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांच्यासह पोलिस कर्मचारी मंदिरात आले. आमदार अमोल खताळ दर्शनासाठी येणार असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव गुंजाळ यांना पोलिसांनी बाहेर काढून कर्मचारी सातपुते व आगलावे यांच्या ताब्यात दिले. पोलिस कर्मचारी गुंजाळ यांना पोलिस वाहनाकडे घेऊन जात असताना संदेश देशमुख तेथे आला. गुंजाळ यांच्या म्हणण्यानुसार, देशमुख याने पोलिसांसमक्ष त्यांच्या डाव्या डोळ्यावर बुक्का मारला तसेच उजव्या गालावर दोन-तीन चापटा मारून दुखापत केली. त्यानंतर जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.



घटना घडताच पोलिसांनी मध्यस्थी करून गुंजाळ यांची सुटका केली. त्यांना उपचारासाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात नेऊन वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्यांना पोलिस ठाण्यात आणण्यात आले. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११५(२) व ३५२ अन्वये अदखलपात्र गुन्हा क्रमांक ११५५/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

प्रकरणाचा पुढील तपास पोलिस कॉन्स्टेबल सोनवणे करीत आहेत. दरम्यान, पोलिसांच्या उपस्थितीतच मारहाणीचा प्रकार घडल्याने या घटनेची संगमनेरच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

# जुन्या वादातून तरुणाची लोखंडी फावड्याने हत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**वैजापूर** : जुन्या किरकोळ वादाच्या कारणावरून एका तरुणाच्या डोक्यात व छातीत लोखंडी फावड्याने वार करून त्याची हत्या केल्याची धक्कादायक घटना वैजापूर तालुक्यातील भायगावगंगा येथे मंगळवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत नवनाथ काशीनाथ वाणी (वय ३२) यांचा मृत्यू झाला असून, राहुल गोरखनाथ ठोकळ याच्यावर हत्येचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत गोपाल कडू कदम (वय २१, रा. भायगावगंगा) यांनी शिऊर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, मयत नवनाथ वाणी हे फिर्यादीचे आतेभाऊ असून ते वाहनचालक म्हणून काम करीत होते. आरोपी राहुल ठोकळ हाही वाहनचालक असून, नवनाथ व राहुल हे काही वेळा एकत्र वाहनावर कामासाठी जात होते. दोघांमध्ये दोन दिवसांपूर्वी किरकोळ वाद झाला होता.

त्यावेळी फिर्यादीने दोघांनाही समजावून सांगितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मंगळवारी दि. १ सप्टेंबर रोजी दुपारी साडेएक ते दोन वाजेच्या सुमारास गोपाल कदम हे शेतातून घरी आल्यानंतर घरासमोरील ओट्यावर बसले होते. त्यावेळी नवनाथ वाणी हे त्यांच्या घरासमोरील रस्त्यावर झाडाखाली उभे होते, तर त्यांची आई काशाबाई वाणी या घराच्या अंगणात बसलेल्या होत्या. याचवेळी राहुल ठोकळ हा आपल्या घरातून हातात लोखंडी फावडा घेऊन आला. त्याने नवनाथ वाणी यांना शिवीगाळ करत जुन्या वादाचा राग काढल्याचा आरोप आहे. त्यानंतर आरोपीने लोखंडी फावड्याने नवनाथ यांच्या डोक्याच्या पाठीमागील बाजूस जोरदार प्रहार केला. या प्रहारामुळे नवनाथ खाली कोसळले व त्यांच्या डोक्यातून रक्तस्राव सुरू झाला. तक्रारीनुसार, नवनाथ खाली पडल्यानंतरही राहुल ठोकळ याने त्यांच्या छातीवर लोखंडी फावड्याने दोनदा वार केले.

हा प्रकार पाहून गोपाल कदम व नवनाथ यांची आई काशाबाई वाणी हे दोघे मध्यस्थी करण्यासाठी धावले असता आरोपी फावडा घेऊन घटनास्थळावरून पसार झाला. र डॉक्टरांनी नवनाथ वाणी यांची तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. त्यानंतर मृतदेह पुढील शासकीय वैद्यकीय प्रक्रियेसाठी देवगाव रंगारी येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आला. या प्रकरणी शिऊर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

## शिक्षक पद भरतीसाठी खा. निलेश लंके यांचे जिल्हा परिषदेसमोर उपोषण सुरु



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शिक्षकांची हजारो पदे रिक्त ठेवून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी खेळ सुरू असल्याचा आरोप करत खा. निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली १ सप्टेंबर पासून अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या कार्यालयासमोर उपोषणाला सुरुवात झाली आहे. शिक्षकांची रिक्त पदे भरा, विद्यार्थ्यांचे भविष्य वाचवा आणि शिक्षणाचा दर्जा टिकवा अशी जोरदार मागणी यावेळी आंदोलकांकडून करण्यात आली. जिल्ह्यात प्राथमिक व पदवीधर शिक्षक संवर्गातील सुमारे २०५४ पदे रिक्त आहेत तसेच प्राथमिक विभागातील मुख्याध्यापकांची १३२ पदे रिक्त असल्याचा दावा खा. लंके यांनी यावेळी केला.

जिल्ह्यात किमान २६५७ पदे रिक्त असून याच थेट फटका विद्यार्थ्यांच्या अध्यापनाला बसत असल्याचे सांगत ही पदभरती तातडीने करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. शिक्षकांवर बीएलओ ड्युटी, मतदार यादी पुनर्नरीक्षण, जनगणना सर्वेक्षण, विविध पोर्टलवर माहिती भरणे, विद्यार्थ्यांचे आधार व बँक खाते काढणे यासह विविध अशैक्षणिक कामांचा बोजा टाकला जात असल्याने अध्यापनासाठी वेळच उरत नसल्याचा आरोप यावेळी खा. लंके यांनी केला. सर्व रिक्त पदे तातडीने भरा. पद भरतीचा कालबद्ध कृती आराखडा जाहीर करा. रिक्त पदांची तालुका निहाय, शाळा निहाय, विषयनिहाय यादी जाहीर करा आणि शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त करा. या प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कासाठी सुरू झालेला हा लढा असून विद्यार्थ्यांच्या भवितव्याची कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. असा इशारा खा. लंके यांच्या वतीने यावेळी देण्यात आला. या आंदोलनात खा. लंके यांच्या समवेत महाविकास आघाडीचे कार्यकर्ते ,पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

## झाडाला लटकलेल्या अवस्थेत तरुणाचा मृतदेह आढळला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : शहरातील आखेगाव रोड परिसरात एका तरुणाचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. ही घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. हॉटेल रिलॅक्स इनपासून सुमारे ५०० ते ६०० फूट अंतरावर ओढ्याजवळ ही घटना घडली.

प्रमोद उर्फ अप्पासाहेब भाऊराव ठुबे (वय २३, रा. लोळेगाव, ता. शेवगाव) असे मृत तरुणाचे नाव आहे. मंगळवारी सकाळी जॉगिंगसाठी गेलेल्या नागरिकांना ओढ्याजवळील एका झाडाला तरुणाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत दिसला.



नागरिकांनी तत्काळ शेवगाव पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शेवगाव तालुका ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला.

या प्रकरणी शेवगाव पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत्यूचे नेमके कारण उत्तरीय तपासणी अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## लोणी परिसरात बिबट्याची दहशत कायम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**प्रवरानगर** : लोणी कुरकुटे वस्ती शिवारातील शंकला हॉस्टेलच्या मागील बाजूस रविवारी दुपारी ३:३० वाजेच्या सुमारास बिबट्याने रविंद्र रावसाहेब शिंदे या तरुणावर हल्ला केल्याने या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार श्री राधाकृष्ण विखेपाटील व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ शालिनीताई विखे पाटील यांनी वनविभागास सक्त सूचना दिल्या की पिंजरे लावून व ड्रोन फिरवून बिबट्यास लवकरात लवकर जेरबंद करा.

त्यामुळे त्या भागात पिंजरे लावून वनविभागाने रात्री ड्रोन फिरवून बिबट्याच्या हालचालींवर लक्ष केंद्रीत केले आहे. काल जखमी रविंद्र शिंदे यांच्या हाताच्या बोटांना टाके टाकले व बोटाचे हाड मोडल्यामुळे त्यावर प्लास्टर सिव्हिल हॉस्पिटल नगर येथे करण्यात येणार आहे.

काल रात्री प्रवरा मेडिकल हॉस्पिटल समोरील परिसर, हसनापुर शिवार, शंकला हॉस्टेल परिसर, मुसळे वस्ती परीसर, भाने वस्ती परीसर या भागात ड्रोन फिरवण्यात आला यावेळी वनरक्षक प्रतीक गजेवर, मानद वन्यजीव रक्षक विकास म्हस्के, प्रमोद विखे, दत्तु मुसळे, सुनिल कदम, अमोल बाजारे हे उपस्थित होते.

लोणी परिसरात बिबट्याचा वावर वाढला आहे. तरी परिसरातील नागरिकांनी, शेतकऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी सावध रहावे व रात्रीचे वेळेस घराबाहेर पडू नये. तसेच शेतकऱ्यांनी शेतात जाताना जोडीदार बरोबर घेऊन जाणे. हातात काठी व बॅटरीचा वापर करावा. मोबाईल वर मोठ्या आवाजात गाणे वाजवावे व बिबट्याची हालचाल दिसल्यास व पाळीव पशुधनावर बिबट्याने हल्ला केल्यास त्वरीत वनविभाग व प्राणीमित्र यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन मानव वन्यजीव संघर्ष समितीचे सदस्य व मानद वन्यजीव रक्षक विकास म्हस्के यांनी केले आहे.

## मी तयार; आमदारांचीही नार्को टेस्ट करा : किरण काळे

### परदेशी खूनप्रकरणी आरोप-प्रत्यारोपांना वेग



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : धीरज परदेशी खूनप्रकरणी सोशल मीडियावर विविध वक्तव्ये केल्याप्रकरणी ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी परदेशी यांच्या पत्नीने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांच्याकडे केली आहे. या मागणीवर प्रतिक्रिया देताना काळे यांनी आपण नार्को टेस्टसाठी तयार असल्याचे सांगत आमदार संग्राम जगताप यांचीही नार्को टेस्ट करावी, असे आव्हान दिले. काळे म्हणाले, मी शहराबाहेर असून अहिल्यानगरमध्ये आल्यानंतर पोलिसांसमोर हजर होऊन स्वतःची नार्को टेस्ट करण्याची मागणी करणार आहे. माझी आणि आमदार संग्राम जगताप यांची नार्को टेस्ट झाल्यास या प्रकरणामागील खरा सूत्रधार समोर येईल. तसेच दोघांचे मागील दहा वर्षांचे सीडीआर, एसडीआर, टॉवर लोकेशन आणि इंटरनेट कॉलिंगची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. परदेशी कुटुंबीयांबाबत आपली कोणतीही तक्रार नसून ते दुःखात असल्याचे काळे यांनी स्पष्ट केले. मात्र, त्यांच्यावर दबाव टाकला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, हत्याकांडाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन करावी, एनआयएकडे काही आरोपांची चौकशी सोपवावी, तसेच परदेशी कुटुंबाला आर्थिक मदत व कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी द्यावी, या मागण्या आपण यापूर्वीच केल्याचे काळे यांनी सांगितले. पोलीस तपासावर आपला विश्वास असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# वडुले शिवारात गांजाची शेती उध्वस्त



## १७० किलो गांजा जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : 'नशामुक्त अहिल्यानगर' अभियानांतर्गत नेवासा पोलिसांनी अमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेला वेग देत तालुक्यातील वडुले शिवारात छापा टाकून गांजाची शेती उध्वस्त केली. या कारवाईत सुमारे ४० ते ५० गांजाची जिवंत झाडे तसेच वाळवलेला गांजा असा एकूण १७० किलो गांजा जप्त करण्यात आला.

वडुले गावच्या शिवारातील एका शेतात गांजाची झाडे लावून त्यांची लागवड केली जात असल्याची गोपनीय माहिती नेवासा पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळाली होती. या माहितीची वरिष्ठ अधिकाऱ्यांना कल्पना देऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर सरकारी पंचांसमक्ष संबंधित शेतात छापा टाकण्यात आला.

या कारवाईत शेतमालक बबन शंकर देशमुख (वय ६०) यांच्या मालकीच्या शेतातून गांजाची जिवंत झाडे आणि वाळवलेला गांजा असा मोठा साठा पोलिसांच्या हाती लागला. पंचांसमक्ष हा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्या आदेशानुसार तसेच अपर पोलीस अधीक्षक वाकचौरे आणि शेवगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईत पोलिस निरीक्षक प्रताप दराडे, उपनिरीक्षक विकास पाटील, हेड कॉन्स्टेबल काळोखे, वाघमोडे, शेळके, गाजरे, बर्डे, पोलीस कॉन्स्टेबल अप्पा वैद्य, गवळी, वाघ, नारायण दमाळे, महिला पोलीस कॉन्स्टेबल गीता पवार, सुमित करंजकर तसेच होमगार्ड सांगळे सहभागी झाले.

### ड्रग्सविरोधात माहिती देण्याचे आवाहन

नेवासा पोलिसांनी नागरिकांना अमली पदार्थांची विक्री, साठवणूक अथवा लागवडीबाबत माहिती मिळाल्यास डायल ११२ किंवा नेवासा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी केले

## दुबार नावे कमी करा, अन्यथा एफआयआर : प्रांताधिकारी पाटील यांचा इशारा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या प्रारूप मतदार यादीमध्ये श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ७४ हजार ७२३ मतदार आहेत. या यादीतून विविध कारणांमुळे ३० हजार ७७४ मतदारांची वगळणी करण्यात आली आहे. यामध्ये १० हजार २०८ मयत, ४ हजार ३८३ अनुपस्थित, ११ हजार ९४७ कायमस्वरूपी स्थलांतरित, तर ४ हजार २३६ दुबार व इतर मतदारांचा समावेश आहे. दरम्यान, मतदार यादीतील दुबार नावे संबंधित मतदारांनी स्वतःहून कमी करून घ्यावीत; अन्यथा चौकशीत जाणीवपूर्वक दोन ठिकाणी नावे असल्याचे आढळल्यास संबंधितांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात येईल, असा इशारा प्रांताधिकारी पाटील यांनी दिला.

दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत आहे. प्राप्त दावे व हरकती निकाली काढण्याचे काम २९ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असून, ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. नवीन मतदार म्हणून नाव नोंदविण्यासाठी नमुना क्रमांक ६, मतदार यादीतून नाव वगळण्यासाठी नमुना क्रमांक ७, तर नावातील दुरुस्ती किंवा इतर बदलांसाठी नमुना क्रमांक ८ भरून द्यावा लागणार आहे. प्रारूप यादीत अद्याप काही मतदारांची दुबार नावे राहिलेली आहेत. मतदारांनी माहिती देताना वेगवेगळी माहिती दिल्यामुळे अशी नावे राहिल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. मात्र, दोन ठिकाणी मतदार म्हणून नाव ठेवणे कायद्यानुसार गुन्हा आहे. त्यामुळे संबंधित मतदारांनी आपले नाव केवळ एका मतदारसंघात कायम ठेवून दुबार नाव वगळण्यासाठी आवश्यक अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले. श्रीरामपूर मतदारसंघात एकूण ३१३ मतदान केंद्रे असून, दोन मतदान केंद्रांचे समायोजन करण्यात आले आहे. त्यामुळे नवीन मतदान केंद्रांची निर्मिती झाली आहे. एखाद्या मतदाराचे नाव प्रारूप यादीत आले नसल्यास त्यांनी घाबरून जाण्याची गरज नाही.



विहित पद्धतीने अर्ज केल्यानंतर त्याची तपासणी करून पात्र मतदाराचे नाव यादीत समाविष्ट केले जाईल. मतदार यादीच्या दावे-हरकतींच्या सुनावणीसाठी प्रशासनाने नियोजन केले असून, एक मतदान नोंदणी अधिकारी, ३२ सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी व त्यांचे सहकारी या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. एखाद्या ठिकाणी २५ पेक्षा अधिक नावांबाबत हरकती आल्यास निवडणूक यंत्रणा स्वतः त्या ठिकाणी उपस्थित राहून सुनावणी घेणार आहे. त्यामुळे संबंधित मतदारांना तहसील कार्यालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. एसआयआरचे काम श्रीरामपूर मतदारसंघात निर्धारित मुदतीत चांगल्या प्रकारे पूर्ण करण्यात आले असून, तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, महसूल विभागातील अधिकारी तसेच बीएलओ यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे प्रांताधिकारी पाटील यांनी सांगितले. मतदार यादी अधिक पारदर्शक करण्यासाठी सर्व राजकीय पक्ष व त्यांच्या प्रतिनिधींनी यादीचा अभ्यास करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

राजकीय पक्षांना दर आठवड्याला मतदार यादी देण्यात येणार असून, प्रारूप मतदार यादीची प्रत नोंदणी करून देण्याबरोबरच पेनड्राईव्हमध्येही निवडणूक शाखेतून यादी उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी तहसीलदार मिलिंद कुमार वाघ, गटविकास अधिकारी स्मिता निकाळजे, नायब तहसीलदार हेमलता वाकडे, महसूल सहायक प्रशांत वाकचौरे, संदीप पाळंदे, भूषण वाव्हळ, अभिजित कोळसे, सिद्धार्थ गवारे, पवन झिंगारे आदी उपस्थित होते.